# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ / श्रावण ४, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७७**

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या आरोग्यविषयक सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१) * १८८७९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १७२३७ ला दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत घरातील व शौचालयातील सांडपाण्यासह सर्वच वाहिन्या नाल्यात सोडल्या जात असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगार कोणत्याही संरक्षक साधनांशिवाय गाळात उतरून साफसफाई करीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालवणी, गोवंडी, घाटकोपर तसेच विविध प्रभागांत छातीपर्यंत उंच असलेल्या गटारातून हाताने गाळ भरून काढताना सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू होण्याच्या घटना घडत असून अशा नाल्यात साफसफाई करण्यास कायद्याने बंदी असतानाही हे कामगार सदरची कामे करीत असल्याने त्यांच्या आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागात कार्यरत शेकडो कर्मचाऱ्यांनी हक्काच्या घरांसाठी दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयासमोरील आझाद मैदानात मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहतींचा पुनर्विकास करताना उभारण्यात येणाऱ्या इमारतींमधील किमान ५०% घरे सफाई कर्मचाऱ्यांना उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) असल्यास, मुंबईतील सफाई कामगारांच्या आरोग्याची समस्या लक्षात घेता त्यांना अत्याधुनिक साधने पुरविण्यासाठी व आरोग्यविषयक सुरक्षिततेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वाहनविराजित यंत्रसामुगीच्या साहाय्याने यांत्रिक पध्दतीने मलनि:सारण वाहिन्यांचे परिरक्षण करण्यात येते.

तसेच मोठ्या नाल्याची सफाई प्रामुख्याने यंत्र सामुग्रीचा वापर करुन करण्यात येते. परंतु, ज्या ठिकाणी यंत्रसामुग्री वापरता येणे शक्य नाही, अशा पर्जन्य जलवाहीन्यांची सफाई अपवादात्मक परिस्थितीत कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांच्या सहाय्याने त्यांना सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाय घेऊन करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

(४) महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या सद्याच्या सेवानिवासस्थानांच्या ठिकाणी, सफाई कर्मचाऱ्यांची सेवानिवासस्थाने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेच्या निकषानुसार मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी ४.०० या कमाल चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५०% सदनिका सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५०% सदनिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने दिनांक १२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २९७०० सफाई कामगारांपैकी ५५९२ सफाई कामगारांना सेवा जेष्ठतेनुसार सेवा सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच, सफाई कामगारांच्या वसाहतीच्या भूखंडावर आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करुन १२००० घरे बांधण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. उर्वरित कामगारांकरिता सेवा सदनिका बांधण्यासाठी भूखंडाची कमतरता असल्यामुळे दिनांक १२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५०% सदनिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत उपलब्ध करुन देणे तुर्तता शक्य नसल्याचे महानगरपालिकेने कळविले.

यास्तव, दिनांक १२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १६/१२/२०२२ रोजीच्या शासन आदेशानुसार सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सफाई कामगारांना सफाईचे काम करण्याकरीता मास्क, परावतीत जॅकेट, हातमोजे, गमबुट, सेफ्टी शुज, सॅनिटाइझर, साबण देण्यात येते. सफाई कामगारांची वर्षातून दोन

वेळेस आरोग्याची चाचणी करुन उपचार केले जातात. तसेच त्यांच्याकरिता कुटुंब आरोग्य विम्याच्या रक्कमेची प्रतीपुर्ती केली जाते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२) * १८८४४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०१६ मध्ये एमजीएम विद्यापीठ शेजारील प्रियदर्शनी उद्यानात मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारकासाठी शासनाने रुपये ३५ कोटी मंजूर करुन प्रत्यक्षात रुपये १० कोटी वितरीत केल्याने स्मारकाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.पालकमंत्री, औरंगाबाद यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी स्मारक व स्मृतीवनाच्या कामाचा आढावा घेतला असून, पुतळयाची संरचना अद्याप पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पुतळयाच्या संरचनेस मान्यता घेऊन निधीचे वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक उभारण्याकरिता शासनाकडून एकूण रुपये ३५.१९ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी रुपये २३.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) व (४) आतापर्यंत मा.बाळासाहेब ठाकरे स्मृतीवन व स्मारकाचे ६० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. अद्यापपर्यंत या प्रकल्पावर रुपये ९.४० कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.

मा.पालकमंत्री, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०४/२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे समिती गठित करण्यात आली आहे. या समितीद्वारे पुतळयाच्या संरचना निश्चित करण्याची बाब अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग शाळांमधील बोगस नोकर भरती व ना-हरकत प्रमाणपत्रांबाबत

**(३) * १९०९२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगासाठीच्या अनुदानित, विशेष शाळा, कार्यशाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी भरतीसाठी नियमबाहय पध्दतीने ना-हरकत प्रमाणपत्रे व वित्तीय प्रशासकीय अनियमितता झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे, सहा. आयुक्त व निरीक्षक यांनी उक्त प्रकरणी कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतचा चौकशी अहवाल गत चार वर्षांपासून प्रशासकीय स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गैरव्यवहार करणारे संबंधित अधिकारी, यंत्रणा, व संस्था यांचेविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी माहे जानेवारी, २०१९ ते मार्च, २०१९ या कालावधीत ना-हरकत प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण व दिव्यांगांच्या शाळांना अनुदानाच्या शिफारशींच्या प्रकरणामध्ये झालेल्या वित्तीय व प्रशासकीय अनियमिततेबाबत दिनांक ९/०४/२०१९ व दिनांक २९/०४/२०१९ च्या पत्रान्वये सबंधितांविरुध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १९/०७/२०१९ अन्वये तीन सदस्यांची समिती गठित करण्यात आली. या समितीने दिनांक १६/०२/२०२० रोजी सादर केलेला अहवाल अमान्य करण्यात येऊन आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक २७/०७/२०२० च्या पत्रानुसार देण्यात आल्या होत्या.

तद्नंतर आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक १७/०१/२०२२ च्या पत्रान्वये सादर केलेल्या पत्रानुसार या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरू करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिनांक १३ जूलै, २०२३ च्या पत्रान्वये आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीतील शिक्षण संस्थांना मालमत्ता कर माफ करण्याबाबत

**(४) * १९८४६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षण संस्थांना आर्थिक भार सांभाळणे अत्यंत जिकिरीचे होत असल्याने शिक्षण संस्था कार्यरत राहाव्यात, यासाठी बुलढाणा महानगरपालिकेसह नगरपालिका हद्दीतील शिक्षण संस्थांना मालमत्ता कर माफ करण्यात यावा, अशी मागणी शिक्षण संस्थांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत मराठी व उर्दु माध्यमांच्या शाळांना घरगुती दराने कर आकारावेत याबाबत तत्कालीन मा.नगरविकास मंत्री यांनी तत्कालीन आयुक्तांना आदेश दिल्याचे तसेच धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थांना मालमत्ता करातून सूट असूनही बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने याबाबतची अंमलबजावणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सभागृहात आश्वासन देऊनही संबंधित महानगरपालिका आयुक्तांनी कार्यवाही केलेली नसून मा.लोकप्रतिनिधी व शिक्षण संस्थाचालक यांच्यासमवेत बैठक न घेण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील विशेषत: बुलढाणा महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या हद्दीतील शिक्षण संस्थांना मालमत्ता कर माफ करण्यासंदर्भात पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

बुलढाणा नगरपालिका व औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील काही शिक्षण संस्थांनी मालमत्ता कर माफ करण्याची मागणी केलेली आहे. असे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या अहवालात नमुद केले आहे.

(२) हे खरे नाही.

तत्कालीन मा.नगरविकास मंत्री यांची प्रशासक, औरंगाबाद महानगरपालिका यांच्या सोबत व्हीडीओ कॉन्फरन्सव्दारे झालेल्या बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली आहे. तथापि, औरंगाबाद महानगरपालिका २०१४ पासून महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळांना निवासी दराने कराची आकारणी करत आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थांना अर्ज केल्यानंतर आयकर करमाफी प्रमाणपत्र तसेच गुणवत्तेनुसार मालमत्ता करात सुट देण्यात येत असते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिका हद्दवाढीतील तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर समायोजन करण्याबाबत

**(५) * १९६०६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १७७२२ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या हद्दवाढीच्या दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ च्या अधिसुचनेपासून ते दिनांक ६ जानेवारी, २०२१ च्या उप सचिव यांचे परिपत्रकातील (अकोला-२०२०/प्र.क्र.५७/नवि-२६ दिनांक ०६ जानेवारी, २०२१ उप सचिव, महाराष्ट्र शासन) निर्देशानूसार विभागीय समितीच्या पडताळणीत पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना परिपत्रकातील १८ मुद्दांच्या अधिन राहून तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर समायोजन करावे, असे निर्देश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या परित्रकानुसार प्रथम पात्र, अपात्र यादी प्रसिध्द करणे, शासनाचे मार्गदर्शन, मंजूरी घेणे, तद्नंतर समायोजन करणे ही कार्यवाही अभिप्रेत असताना अकोला महानगरपालिकेकडून जाणीवपूर्वक उलट प्रक्रिया राबवून ३१ कर्मचारी पात्र असल्याचा अहवाल शासनास देऊन ३१ पात्र कर्मचाऱ्यांची यादी अकोला महानगरपालिकेकडून प्रसिध्द करण्यात येऊन, यांतील पात्र यादीतील ५ कर्मचारी विविध कारणान्वये अपात्र करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपात्र कर्मचाऱ्यांनी न्यायालयात रिट याचिका दाखल केली असल्याने रिट याचिकेतील निर्देशानूसार (प्रतिवादी) पक्षकाराने ४ आठवड्यानंतर बाजू मांडेपर्यंत यथास्थिती कायम ठेवण्याबाबत न्यायालयाने निर्देश दिले, परंतु, दिनांक २८ जून, २०२१ पासून माहे मे, २०२२ पर्यंत बाजू मांडून सदर प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला नसल्याने पात्र उमेदवारही समायोजनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

अकोला महानगरपालिकेने एकूण ८९ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या दस्ताऐवजांची पडताळणी केली असता विभागीय समितीने ३१ पात्र ग्रामपंचायत कर्मचाऱ्याची मूळ नियुक्ती प्रचलित नियमानुसार आहे की नाही याबाबत दिनांक २४/०५/२०२१ रोजी पुर्नतपासणी केली. या ३१ पात्र ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचाऱ्याच्या दस्ताऐवजांमध्ये त्रुट्या आढळून आल्याने प्राथमिक स्तरावर २६ कर्मचारी पात्र दर्शविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर अपात्र ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.१८८९/२०२१ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २८/०६/२०२१ रोजी स्थगिती आदेश दिले होते. सदर आदेश दिनांक २८/०९/२०२२ रोजी उठविण्यात आले आहेत. अकोला महानगरपालिकेच्या १५०९ पदांच्या आकृतीबंधास मंजूरी देण्यात आली असून, सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुख्याधिकारी वर्ग-१ या पदांवर विभागीय चौकशी सुरू असताना पदोन्नती दिल्याबाबत

**(६)** * **१९०३४ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्याधिकारी वर्ग-१ च्या पदोन्नतीमध्ये सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ मध्ये विभागीय चौकशी सुरु असताना निलंबित तसेच गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असतानाही मोठ्या प्रमाणावर दिलेल्या

पदोन्नतीमुळे लोकप्रतिनिधींनी मुख्याधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तिकांच्या सत्यप्रती मिळण्यासाठी तीन पत्रे देऊनही माहिती देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागितलेल्या माहितीपैकी पदोन्नती याद्या दिनांक १० मार्च, २०२३ रोजी देण्यात आल्या परंतु, यांतील पदोन्नत अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तिकेच्या छायांकित प्रती नगरविकास मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा यामध्ये सहभाग असल्याने अद्यापपर्यंत जाणीवपूर्वक दिलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पदोन्नतीमध्ये विभागीय चौकशी सुरू असताना व निलंबित तसेच गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असतानाही याची नोंद सेवापुस्तिकेमध्ये घेतलेली नसल्याने त्यांना पदोन्नती देण्यात आलेली असून यामध्ये नगरविकास मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने सदरील माहिती मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी पाठवून ती लपविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक मंत्रालयातील अधिकाऱ्यांकडून केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

सन्माननीय सदस्यांनी मागितलेली पदोन्नती संदर्भातील सर्व माहिती शासन पत्र दिनांक १०/०३/२०२३ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, सेवा पुस्तकांच्या प्रतींसंदर्भात शासन पत्र दिनांक १४/०६/२०२३ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

(२) व (३) नाही.

मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सेवापुस्तके मंत्रालयीन विभागस्तरावर ठेवण्यात येत नाहीत.

पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांसंदर्भात विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण सुरु आहे किंवा कसे ही बाब विचारात घेऊन पदोन्नती समितीकडून निर्णय घेण्यात येतो.

सेवापुस्तकांच्या प्रतींसंदर्भात शासन परिपत्रक दिनांक २७/०७/२०१५ आणि १४/०२/२०२० मधील तरतुदींनुसार सन्माननीय सदस्यांना कळविण्यात आले आहे. तसेच, ज्या अधिकाऱ्यांविरुध्द गंभीर गुन्हे, निलंबन वा विभागीय चौकशी चालु असताना केवळ सेवापुस्तकात नोंद नसल्यामुळे पदोन्नती देण्यात आली अशा अधिकाऱ्यांसंदर्भात तपशिल उपलब्ध असल्यास व सदर तपशिल उपलब्ध करुन दिल्यास त्याबाबत सविस्तर चौकशी करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व केलेल्या कार्यवाहीबाबत सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येईल, असेही दिनांक २४/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील अग्निशमन दलाच्या कात्रज स्टेशन ड्युटी ऑफिसर यांच्यावर कारवाई करणेबाबत

**(७)** * **१८८१३ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील अग्निशमन दलातील कात्रज स्टेशन ड्युटी ऑफिसर हे फायर एनओसीसाठी स्थानिक व्यावसायिकांना व नागरिकांना नाहक त्रास देत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फायर एनओसीसाठी नाहक त्रास देणाऱ्या या अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ फेब्रुवारी,२०२३ रोजी पुणे महानगरपालिका मुख्य अग्निशमन अधिकारी,अग्निशमन दल, पुणे यांना पत्र पाठवून तसेच वेळोवेळी पाठपुरावा करून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६/०२/२०२३ रोजी पुणे महानगरपालिका, मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन दल, पुणे यांना पत्र पाठवून कारवाई करणेबाबत मागणी करण्यात आलेली होती, हे खरे आहे.

सदर तक्रारीची त्वरित दखल घेवून या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी अग्निशमन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली होती.

तसेच सदर चौकशी कालावधीमध्ये कात्रज अग्निशमन केंद्राच्या संबंधित अधिकाऱ्याचे ना-हरकत अदा करण्याचे अधिकार स्थगित करण्यात आले. संबंधित अधिकाऱ्याने गेल्या २ वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांच्यामार्फत विविध व्यवसायासाठी देण्यात आलेले ना-हरकत दाखले व कागदपत्रे तपासण्यात आलेली आहेत.

ना-हरकत दाखले अदा करताना पुरेशी कागदपत्रे तपासल्यानंतर, ना-हरकत दाखले अदा करण्यात आलेले आहेत. तसेच जे ना-हरकत दाखले प्रलंबित आहेत, अशा व्यवसायिकांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्याने व आवश्यक अग्निशमन फी भरण्यास तयार नसल्याने ना-हरकत दाखले देणे प्रलंबित असल्याचे चौकशी अधिकाऱ्याच्या तपासणी दरम्यान आढळून आलेले आहे.

त्यामुळे यामध्ये कोणतीही अनियमितता झाल्याचे आढळून येत नसल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांच्या रासायनिक सांडपाण्यामुळे प्रदूषण होत असल्याबाबत

**(८) * १९५०८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांच्या रासायनिक सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून, भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत देखील मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहेत याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील ग्रामपंचायत हद्दीतील कूपनलिका व विहिरीतील पाणी प्रदूषित झाल्याने एमआयडीसीद्वारे मोफत शुध्द पाणीपुरवठा करण्यात यावा, ग्रामपंचायतींना पूर्वी देण्यात आलेली पाण्याची देयके माफ करणे, प्रदूषित रासायनिक सांडपाण्यामुळे बाधित झालेल्या जमिनीचे कृषी विभागाकडून सर्व्हेक्षण करून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे, औद्योगिक क्षेत्राच्या परिसरातील कूपनलिका व विहिरीतील पाणी तसेच दौंड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील पाण्याची चाचणी करणे व परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांक तपासणीसाठी यंत्रणा बसविणे, तसेच सर्व उद्योगांमध्ये परिसरातील ग्रीन कव्हर वाढविण्यासाठी वर्गीकरण सक्तीचे करणे आदी मागण्या मा.पर्यावरण मंत्री महोदयांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मागण्यांची पुर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) कुरकुंभ एमआयडीसीमधून सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रीत पाण्यामुळे होत असलेल्या प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.ॲड राहूल कुल, मा.विधानसभा सदस्य यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेमध्ये दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मा.मंत्री (शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग व मराठी भाषा विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०४/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.विधानसभा सदस्य यांनी प्रश्नाधिन मुद्दे उपस्थित केले होते. मा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मंत्री, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग व मराठी भाषा विभाग यांनी बैठकीदरम्यान दिले होते. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत दिनांक १८/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्य उदयान अधीक्षक व सचिव पदांवरील नियुक्तीबाबत

**(९) * १९५३१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या सेवेतील मुख्य उदयान अधीक्षक हे पद तांत्रिक संवर्गातील आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांस अतांत्रिक /प्रशासकीय संवर्गातील अधिकारी पदाचा पदभार देण्यात येऊ नये, असा शासन निर्णय व कल्याण–डोंबिवली महानगरपालिका सेवा भर्ती नियम, दिनांक १ जून, २०२१ मध्ये अंतर्भूत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय संवर्गातील वर्ग-१ चे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी उपलब्ध आहेत तसेच महानगरपालिका सचिव पदाच्या निम्न संवर्गातील वर्ग-२ चे पदोन्नती पात्र अधिकारी उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासकीय संवर्गातील अधिकारी तसेच निम्न संवर्गातील पदोन्नती पात्र अधिकारी उपलब्ध असतानाही आणि अतिरिक्त कार्यभार देतांना ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी पदभार देता येत नाही असा शासन निर्णय असतानासुध्दा श्री.जाधव यांना महानगरपालिका सचिव या पदावर ६ वर्षांपेक्षा अधिकचा कालावधी होऊनही बदलले नसल्याने संबंधित जबाबदार अधिकारी यांच्यावर काय कार्यवाही करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत प्रशासकीय संवर्गातील ‘उप आयुक्त, वर्ग-१ चे प्रतिनियुक्तीवरील ६ अधिकारी कार्यरत आहेत.

सद्य:स्थितीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सचिव पदाच्या निम्नसंवर्गातील कार्यरत कर्मचारी हे महानगरपालिका सचिव पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत.
(४) सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासकीय श्रेणी-१ संवर्गात महानगरपालिका सचिव पदासाठीची विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणारा अधिकारी उपलब्ध नसल्याने, प्रशासकीय सोय व कामकाजाची निकड विचारात घेऊन, विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यास प्रभारी महानगरपालिका सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आला आहे.

योग्य उमेदवार उपलब्ध झाल्यावर सदर अतिरिक्त पदभार काढण्यात येईल, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील नेरूळ आणि सरसोळे खाडी किनारी डेब्रिजचा भराव टाकल्याबाबत

**(१०) * १९७७७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील नेरूळ आणि सरसोळे खाडी किनारी डेब्रिजचा भराव टाकण्याचा प्रकार मागील काही दिवसांपासून सुरू असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईला बेलापूर पासून ऐरोलीपर्यंत विस्तीर्ण असा खाडी किनारा लाभला असल्याने किनारा प्रदूषित होऊ नये तसेच नेरूळ येथील आईच्या खाडी किनाऱ्यासोबत सरसोळे खाडीच्या जेट्टीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकल्याने भरतीच्या वेळी सदर डेब्रिज पाण्यात जाऊन पाणी दूषित होण्याची भीती पर्यावरणप्रेमी आणि कांदळवणाची स्वच्छता करणाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आल्याचे खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबईतील खाडीकिनारे स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी आणि बांधकामाचे डेब्रिज टाकणाऱ्यांवर कोणती कारवाई प्रशासनाकडून केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर खाडी किनारी काही प्रमाणात डेब्रीज टाकण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर बाब निदर्शनास आल्यानंतर, या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन मच्छीमारी करणाऱ्या नागरिकांमार्फत मार्च अखेरीस डेब्रीज उचलून घेण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी डेब्रीज नाही.

(२) होय, हे खरे आहे.

अशा आशयाच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त होतात, त्यावर वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

(३) नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण चार डेब्रीज विरोधी भरारी पथके तैनात असून, त्यांच्यामार्फत अनधिकृत डेब्रीज टाकणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

माहे मार्च, २०२२ ते जून, २०२३ या कालावधीत ९२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून रुपये १८,६७,५००/- इतके दंडात्मक शुल्क वसुल करण्यात आलेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी डेब्रीज टाकण्याचे प्रकार हे रात्री अपरात्री होतात. त्याकरिता संभाव्य ठिकाणी गस्त वाढूवन डेब्रीज पडणार नाही याची अतिदक्षता घेण्यात येत असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी व पदोन्नतीबाबत

**(११) * १९४६९ श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.कपिल पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबतचा प्रस्ताव राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ यांचेकडे विचारार्थ सादर करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दिव्यांगांच्या कर्मशाळेतील निदेशकांच्या वेतनश्रेणी व कालबध्द पदोन्नतीतील तफावत दूर करण्यासाठी (पाचव्या वेतन आयोगापासून) दिनांक १८ ऑगस्ट, २००४ मधील शासन निर्णयात सुधारणा करून शुध्दीपत्रक काढण्याची मागणी विविध संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष शाळेतील पदवीधर चित्रकला, शारिरीक क्रीडा शिक्षक यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या आदेशान्वये समान शैक्षणिक अर्हता, समान काम, समान वेतन यानुसार सुधारित वेतनश्रेणीचे लाभ व पदोन्नतीची संधी मिळण्यासाठी मा.लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाप्रमाणे आरटीईनुसार विशेषशाळा, कर्मशाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना सोयीसवलती मिळण्याबाबत तसेच वित्त विभागाच्या दिनांक १३ फेब्रवारी, २०२३

रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने दिव्यांग शाळेतील शारिरीक शिक्षकांना पदवीधर बीपीएड वेतनश्रेणी लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिव्यांग शाळेतील शारिरीक शिक्षकांना पदवीधर बीपीएड वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळेत कार्यरत शारिरीक शिक्षक व निदेशक यांना पदवीधर बी.एड. समकक्ष बी.पी.एड. वेतनश्रेणी लागू करणेबाबतचा प्रस्ताव राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ च्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. तथापि, दिनांक १३/०२/२०२३ रोजी राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चा अहवाल खंड-२ मधील वेतनश्रेण्यांविषयक अनुषंगिक शिफारशी स्विकृत करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून, त्यामध्ये उक्त पदांचा समावेश केलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यामध्ये वसंतराव नाईक तसेच अण्णाभाऊ साठे संशोधन प्रशिक्षण संस्थांच्या स्थापनेसह बार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांची स्वायत्तता कायम ठेवण्याबाबत

**(१२) * १९७०८ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्टीच्या धर्तीवर सारथी, महाज्योती इ. संस्था स्थापन झाल्या असून बंजारा समाजाकरिता वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) निर्मितीची घोषणा माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये केली आहे तसेच बार्टीच्या धर्तीवर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) निर्मिती करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३ मध्ये सभागृहात सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उच्च शिक्षण संस्था आणि विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी आणि मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती आणि सुविधांमध्ये तफावत असल्याने त्या दूर करण्याचा व त्यामध्ये एकसमानता आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून याबाबत दिनांक १० मे, २०२३ रोजी बैठक घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी) आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या ४ संस्था त्यादृष्टीने प्रस्ताव तयार करीत असून या संस्थांच्या नियामक मंडळाने घेतलेले निर्णय मुख्य सचिवांकडे मान्यतेसाठी पाठवावे असा नियम

लागू करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रस्तावामुळे बार्टी, महाज्योती, सारथी व टीआरटीआय या संस्थांची स्वायत्तता धोक्यात आली असल्याची तक्रार विविध संघटना तसेच शिक्षण तज्ञांनी शासनाकडे व्यक्त केली असून यामुळे विद्यार्थी आंदोलने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील संस्थांची स्वायत्ता कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) गोर बंजारा जमातीचे प्रमुख प्रश्न या विषयांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे आयोजित बैठकीत वनार्टी संस्था सुरु करण्याचा प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करण्याबाबत इतर मागास बहुजन कल्याण विभागास सूचना दिल्या आहेत. तसेच आर्टी स्थापानेबाबत मा.मुख्यमंत्री यांनी मातंग समाजाच्या लोकसंख्येबाबत बार्टी व महामंडळे यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना इत्यादीबाबतची वस्तुस्थिती घेण्याच्या सूचना दिल्या असून त्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्पयात आहे.
(२), (३), (४) व (५) दिनांक ०३ मे, २०२३ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये शासनाचे विविध विभाग/ उपक्रम/ महामंडळे यांच्यामार्फत उच्च शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचे निकष एकसारखे असावेत यासाठी शिफारस करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिलेले आहेत. तसेच मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/०५/२०२३ व दिनांक ०१/०६/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफराशीच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजाचे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिसंख्य कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध करून देणेबाबत

**(१३) * १९५८८ श्री.आमश्या पाडवी, श्री.जयंत पाटील, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १७८३८ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी समाजाकरिता आरक्षित असलेल्या जागेवर नोकरीस लागून जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना शासन सेवेतून बडतर्फ करून त्यांचेवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे, अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम ठेवणे हे संविधानाच्या तरतुदींशी विसंगत कृती ठरेल अशा आशयाचा निकाल मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या निकालाच्या विसंगत कृती करून शासन निर्णयाचा आधार घेत अनेक अधिकारी/कर्मचारी यांना अधिसंख्य पदावर वर्ग करून त्यांना सेवेत कायम ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा अधिकारी /कर्मचारी यांची तपशीलवार माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे उपलब्ध असणे आवश्यक असून सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत मा.लोकप्रतिनिधींनी माहे

जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर माहिती सामान्य प्रशासन विभागाने उपलब्ध करून देणेऐवजी शासनाच्या प्रत्येक विभागाने ती माहिती परस्पर मा.लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी, असे पत्र सामान्य प्रशासन विभाग यांनी अग्रेषित करीत या विषयातून बेजबाबदारपणे अंग काढून घेण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर माहिती ही वेळेत संबंधित मा.लोकप्रतिनिधींना प्राप्त होऊ नये याकरिता विभागीय सह सचिव व उप सचिव यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्याचे व आदिवासी समाजाच्या हिताच्या दृष्टीने असलेली माहिती लोकप्रतिनिधींना तात्काळ उपलब्ध करुन न देणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिविल अपिल क्र. ८९२८/२०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर एफसीआय आणि इतर वि. जगदिश बालाराम बहिरा व इतर याचिका यामध्ये) दिनांक ०६/०७/२०१७ रोजी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागास वर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतुदींशी विसंगत ठरते, असा निर्णय दिला.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित पदावरून कमी करून त्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून तसेच प्रशासनाची अडचण होऊ नये यासाठी त्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत.
(३), (४) व (५) मा.श्री.आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी दिनांक २३/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने व सदर माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे संकलीत करण्याची आवश्यकता नसल्याने सामान्य प्रशासन विभागाने सदर माहिती संकलित केलेली नाही. तथापि, आमदार महोदयांच्या विनंतीनुसार त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना दिनांक २३/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. आतापर्यंत ७ विभागांनी लोकप्रतिनिधींना माहिती दिली असून उर्वरित विभागांना तात्काळ माहिती उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक ०६/०७/२०२३ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित अराजपत्रित गट 'ब' व गट 'क' च्या सेवा संयुक्त पूर्व परिक्षा, २०२३ बाबत

**(१४) * १९५५७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३० एप्रिल २०२३ रोजी नियोजित अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची प्रवेश प्रमाणपत्र व प्रश्नपत्रिका टेलिग्राम या सोशल मीडियावर चॅनेलवर

उपलब्ध करून देण्यात आल्याचा प्रकार दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी सायबर पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे व गोपनीय माहिती उघड झाल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय व सदर चौकशीत कोणती माहिती निष्पन्न झाली आहे व संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे,
(४) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत तसेच सुरक्षेच्यादृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने व शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी आयोजित परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या एकूण ४,६६,४५५ उमेदवारांपैकी ९४,१९५ उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे MPSC२०२३A या टेलिग्राम चॅनेलवर दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी प्रदर्शित झाली होती. तथापि, तद्नंतर आयोगाच्या कार्यालयाकडून तातडीने केलेल्या उपाययोजनांमुळे अन्य उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे सदर टेलिग्राम चॅनेलला प्रदर्शित करता आली नाहीत.
(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत सीबीडी बेलापूर पोलीस स्टेशन येथे सदर प्रकरणी गुन्हा (गु. र. नं. ०७९/२०२३) दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीसांच्या सायबर सेलकडून करण्यात आलेल्या तपासाअंती गुन्हेगारास दिनांक २५ मे, २०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.
(३) आयोगाच्या संकेतस्थळावर बाह्य व्यक्तीकडून करण्यात आलेला सायबर हल्ल्यामध्ये काही उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रांची माहिती उघड झाली आहे. इतर कोणतीही वैयक्तिक विदा(डेटा)/गोपनीय माहिती उघड झालेली नाही. सदर सायबर हल्ल्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळाचे व्यवस्थापन करणाऱ्या तांत्रिक सेवा पुरवठादार संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगाकडून प्रक्रिया सुरु आहे.
(४) आयोगाच्या संकेतस्थळांवर भविष्यात होऊ शकणारे सायबर हल्ले रोखण्याच्या अनुषंगाने आयोगाकडून आवश्यक सुरक्षाविषयक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुरुड (जि.रायगड) आगारातील बसगाड्या नादुरूस्त असल्याबाबत

**(१५)** * **१९६१७ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुरुड (जि.रायगड) आगारातील सुमारे २५ बसगाड्या नादुरूस्त असल्याने सुमारे ४० फेऱ्यांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात ३३ फेऱ्या सुरु असल्यामुळे प्रवाशांच्या होणाऱ्या गैरसोयीप्रकरणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे दिनांक २५ मार्च,२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फाटलेले टायर, तुटलेले पत्रे, वारंवार बंद पडणाऱ्या गाड्या तसेच वाढणारी प्रवाशी संख्या यामुळे अपुरा कर्मचारी वर्ग तसेच नादुरुस्त बसेसची लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी अशीही मागणी उक्त तक्रारीमध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.
मुरुड अगारामध्ये ३६ बसेस असून ९२ फेऱ्या चालनात आहेत.
(२) वाहनांची दैनिक, दशक तपासणी तसेच त्रैमासिक डेपो डॉकिंग करण्यात येते. सुस्थितीत असलेली वाहनेच मार्गावर देण्यात येतात. वाहनांचे टायर तपासणी करून वेळोवेळी बदली करण्यात येतात.
मुरुड आगारामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्धआहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींच्या पुनर्विकास धोरणाबाबत

**(१६) * १९४४० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचे बांधकाम होऊन जवळपास ५५ ते ६० वर्षे कालावधी होऊनही बहुतांश इमारती मोडकळीस आलेल्या असून अशा संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास होणे अत्यंत आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाकरिता समितीचे गठन करून धोरण बनविण्याबाबतचा निर्णय दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या बैठकीत झाला असून त्यानुषंगाने समितीच्या अहवालानुसार दिनांक १६ मे, २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत धोरण जाहीर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुनर्विकासांकरिता जाहीर करण्यात आलेल्या धोरणाचे स्वरुप काय आहे तसेच सदर धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून सुरु होणार असून याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) राज्यातील मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाकरिता मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजना (Post War Rehabilitation) या योजनेंतर्गत इमारतीच्या पुनर्विकासाचे धोरण मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोढा हेरिटेज (डोंबिवली पूर्व, जि.ठाणे) येथील चंद्रेश वास्तू (एफ) हौसिंग को-ऑपरेटीव्ह सोसायटीमधील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(१७) * १९१३६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील लोढा हेरिटेज (डोंबिवली पूर्व, जि.ठाणे) येथील चंद्रेश वास्तू एफ हौसिं को-ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये झालेली अनधिकृत बांधकामे कायदेशीर बाबींचा (डी.पी.एल.) अवलंब करुन निष्कासित करण्याबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ एप्रिल व २३ मे, २०२३ रोजी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करुन सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात येणार होते परंतु आजतागायत विविध कारणे देऊन निष्कासनाची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई तसेच सदरची अनधिकृत बांधकामे त्वरित निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) संबंधित सोसायटीने बांधकाम (शेड) नियमित करणेकामी नगररचना विभागाकडे यापुर्वी प्रस्ताव सादर केला होता.

त्यास अनुसरून इमारतीच्या छतावरील पावसाळी शेडसाठी नगररचना विभागाने परवानगी दिलेली आहे.

उर्वरित नकाशा व्यतिरिक्त शेड, सोसायटीचे कार्यालय व शौचालयावर दिनांक ०४/०७/२०२३ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) दिनांक ११ एप्रिल व २३ मे, २०२३ रोजी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. परंतु स्थानिक पोलीस बंदोबस्त उपलब्ध न झाल्याने, सदर दिवशी निष्कासनाची कारवाई करता आली नाही.

तद्नंतर दिनांक ०४/०७/२०२३ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोविड -१९ या संसर्गजन्य आजारामुळे मृत्यू झालेल्यांच्या वारसांना अनुदान वितरीत करणेबाबत

**(१८) * १९९६४ श्री.किरण सरनाईक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक १४३३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड -१९ या संसर्गजन्य आजाराच्या कालावधीत कर्तव्यावर असताना कोविड -१९ या आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना विमा कवच/सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेले नाही तसेच घरातील कर्ता पुरुष, पती गमावलेल्या एकल महिलांसह कोरोना मृतांच्या वारसांना शासनाकडून रुपये ५० हजार सहायक अनुदान देण्यात येते परंतु, दीड वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापही मृत्यूमुखी झालेल्यांच्या कुटुंबियांना अनुदान वितरीत करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण मृतांपैकी अनुदानासाठी प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांपैकी ८ हजार ५४२ अर्ज प्रलंबित असल्याचे व अर्ज मंजूर झाल्यानंतरही अद्यापही अनेक बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोविड -१९ मध्ये कर्तव्यावर असतना कोविड -१९ या संसर्ग आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना तसेच पती गमावलेल्या एकल महिलांसह मृतांच्या वारसांना विमा कवच/सानुग्रह अनुदान वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) नाही.
(२) नाही, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मंजूर केल्यापैकी ८१७३ इतक्या अर्जदारांचा बँक खाते तपशील बरोबर नसल्याने बँकेने प्रदान नाकारले आहे.
(३) कोविड विषाणूच्या सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध चाचणी, उपचार व मदत कार्य या कार्यवाहीशी संबंधित कर्तव्यावर कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना रुपये ५० लक्ष रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात विमा कवच पुरविण्याबाबत वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दिनांक २९ मे, २०२० अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार पात्र ठरणाऱ्या प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाकडून अनुदान वितरित केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम.टी. अगरवाल रुग्णालयास जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टमार्फत बोगस डॉक्टर पुरविण्यात आले असल्याबाबत

**(१९) * १९०३६ श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुलुंड येथील एम.टी. अगरवाल रुग्णालयातील बोगस डॉक्टरांमुळे रुग्णांना जीव गमवावा लागत असल्याची बाब माहितीच्या अधिकारातून मागविलेल्या माहितीव्दारे निदर्शनास आली असून, जीवन ज्योत चॅरीटेबल ट्रस्टमार्फत महानगरपालिकेच्या एम. टी. अगरवाल रुग्णालयाला बोगस डॉक्टर पुरविण्यात येत असल्याने गत १० महिन्यांमध्ये या रुग्णालयातील आयसीयू विभागातील १४९ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलुंड कॉलनीतील गोल्डी शर्मा यांनी या ट्रस्टविरुध्द दाखल केलेल्या पोलीस तक्रारीतून डॉ. परवेज शेख अजीज, डॉ. अविनाश प्रसाद आणि डॉ. राजेश या तीन डॉक्टरांनी या ट्रस्टमार्फत अगरवाल रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात काम केले असल्याची माहिती श्री.शर्मा यांना मिळाली आहे, हे ही खरे

आहे काय,

(३) असल्यास, डॉ.परवेज शेख अजीज यांच्याविरोधात मालवणी पोलीस ठाण्यात बोगस डॉक्टर असल्याबाबत, ठाणे कोविड हॉस्पिटल येथे कोविड रुग्ण उपचारासाठी दाखल करण्याकरीता केलेल्या गैरव्यवहाराबाबत कापुरबावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असून, नोंदणी पत्रावरील डॉक्टर व उपचार करणारे डॉक्टर वेगळेच असल्याने बोगस डॉक्टरांची संख्या जास्त असल्याची शक्यता असणे अशा सर्व डॉक्टरांनी किती रुग्णांवर उपचार केले, यापैकी किती रुग्णांना जीव गमवावा लागला याची देखील चौकशी करण्याची मागणी श्री.शर्मा यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेला बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासकीय रुग्णालयातील आयसीयू विभागात तीन शिफ्टसाठी डॉक्टर पुरविण्याचे कंत्राट दिले असून त्यासाठी दिनांक १७ मे, २०१८ पासून ते दिनांक १६ मे, २०२० पर्यंत ट्रस्टला रुपये ८ कोटी ८३ लाख ३० हजाराची रक्कम मोबदला म्हणून देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टमार्फत नेमणूक करण्यात आलेले डॉक्टर हे योग्य पदवीधर आहेत की नाही याची माहिती श्री.शर्मा यांनी माहिती अधिकारात मागवली असून संबंधित काही शासकीय कार्यालयांकडे तक्रारीही दिल्या असून या तक्रारीवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टमार्फत एम.टी.अगरवाल रुग्णालयास बोगस डॉक्टर पुरविल्याबाबत तसेच संबंधित बोगस डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत दिनांक १७/०५/२०१८ पासून मुलुंड (प) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात तीन सत्रामध्ये केवळ इंटेन्सिव्हिस्ट डॉक्टरांच्या सेवा घेण्यात आल्या. सदर संस्थेने अतिदक्षता विभागात प्रत्येक सत्रामध्ये एक पदवीधर एमबीबीएस डॉक्टर आणि एक पदव्युत्तर पदवी किंवा पदविकाधारक डॉक्टर देणे अपेक्षित होते.

अतिदक्षता विभागामध्ये गंभीर तसेच अतिगंभीर रुग्ण दाखल होतात. सदर विभागामध्ये गेल्या दहा महिन्यांत एकूण १३४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(२) व (३) श्री.गोल्डी शर्मा यांनी मा.२७ वे न्यायालय, मुलुंड येथे अर्ज दाखल केला होता.सदर अर्जावरील सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने सी.आर.पी.सी. कलम १५६ (३) अन्वये दिलेल्या आदेशान्वये मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २९८/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांमार्फत सदर गुन्ह्याचा सखोल तपास सुरु असून जीवन ज्योत चॅरीटेबल ट्रस्टमार्फत एम.टी.अगरवाल रुग्णालय, मुंबई येथे काम केलेल्या डॉक्टरांमध्ये ४ बनावट डॉक्टर असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांनी एकूण ८४ मयतांचे मृत्यू दाखले दिले असून त्यापैकी ७४ मयतांच्या उपचारांचे कागदपत्रे पडताळून अभिप्राय देण्याकरिता अधिष्ठाता, सर जे.जे. रुग्णालय यांचेकडे मुलुंड पोलीस ठाणेमार्फत दिनांक ०७/०७/२०२३ रोजी पाठविण्यात आले आहेत.

(४) जीवन ज्योत संस्थेने महानगरपालिकेच्या ९ रुग्णालयामध्ये दिनांक १७/०५/२०१८ ते १६/०५/२०२० या कालावधीत दिलेल्या डॉक्टरांच्या सेवांकरिता महानगरपालिकेमार्फत रुपये १२,२९,७५,९००/- इतके अधिदान करण्यात आले आहे.

(५) श्री.गोल्डी शर्मा यांनी माहितीच्या अधिकारात मागविलेली उपलब्ध माहिती त्यांना महानगरपालिकेमार्फत देण्यात आली आहे.

(६) जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट यांनी श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात प्रत्येक सत्रामध्ये एक पदवीधर एमबीबीएस डॉक्टर आणि एक पदव्युत्तर पदवी किंवा पदविकाधारक डॉक्टर देणे अपेक्षित होते. यामध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे महानगरपालिकेने संस्थेकडून रुपये ५,१३,०००/- इतका दंड वसूल केला आहे.

श्री.गोल्डी शर्मा यांनी जीवन ज्योत ट्रस्टविरुध्द मुलुंड पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. त्यानुषंगाने मुलुंड पोलीस ठाणेमार्फत श्रीमती म.तु अगरवाल रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाबाबत माहिती मागवली होती. सदर माहिती महानगरपालिकेमार्फत मुलुंड पोलीस ठाण्याला उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत, महानगरपालिकेमार्फत जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सेवा खंडित करुन त्यांना दिनांक ०५/०७/२०२३ पासून ३ वर्षाकरीता काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

४ पैकी २ बनावट डॉक्टर आणि जीवन ज्योत चॅरीटेबल ट्रस्ट चे एच.आर.मॅनेजर यांना पोलिसांमार्फत अटक करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत तिन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून इतर आरोपींचा शोध घेण्याची कार्यवाही पोलीसांमार्फत सुरु आहे.

जीवन ज्योत चॅरीटेबल ट्रस्टचे विश्वस्त यांनी अटकपूर्व जामिनाकरिता मा.६० वे सत्र न्यायालय, मुंबई येथे अर्ज केला असून त्यावरील अंतिम आदेश प्रलंबित आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहराच्या जुन्या पाणीपुरवठा योजनेच्या बळकटीकरणाच्या कामाकरिता निविदा प्रक्रीया वाढीव दराने प्राप्त झाल्याबाबत

**(२०) * १९३१० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराच्या जुन्या पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी निविदा वाढीव दराने प्राप्त झाल्या असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाच्या निविदा वाढीव दराने प्राप्त झाल्याने अतिरिक्त खर्चाचा भार औरंगाबाद महानगरपालिकेवर पडणार असल्याने उक्त महानगरपालिकेच्या विकास कामांवर त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेवर सदरहू कामांचा भार पडू नये याकरीता कार्यवाही करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने अतिरिक्त खर्चाचा भार औरंगाबाद महानगरपालिकेवर पडणार नाही या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पातील जुन्या पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करण्यासाठीचे काम गतीने होण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजनेच्या कामाच्या पाच भागात वेगवेगळया निविदा मागविण्यात आलेल्या होत्या या पाच निविदांपैकी दोन भागांच्या निविदा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा कमी दराच्या व तीन भागांच्या निविदा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त दराच्या प्राप्त झाल्या होत्या.
(२) या प्रकल्पांतर्गत जुन्या पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करण्याच्या तीन कामांच्या निविदेतील समाविष्ट बाबींचे दर नवीन दरसूचीनुसार वाढण्याची शक्यता आणि या कामांचा कालावधी विचारात घेऊन अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाली होती तथापि, शहरातील पाणीपुरवठा नियमित होण्यासाठी सदर प्रकल्प तातडीने पूर्ण होणे आवश्यक असल्याने सदर निविदा वाटाघाटीअंती अधिक दराने स्विकारणे क्रमप्राप्त ठरले. सबब, त्याचा भार महानगरपालिकेवर पडणार आहे.
(३), (४) व ५) सदर विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय विधानपरिषद विरोधी पक्षनेता यांचे जुन्या पाणीपुरवठा योजनेच्या बळकटीकरणाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेबाबतचे दिनांक ३ मे, २०२३ रोजीचे पत्र आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राप्त झाले होते व सदर पत्रास अनुसरून संबंधितांमार्फत सन्माननीय विधानपरिषद विरोधी पक्षनेता यांना सविस्तर अहवालाद्वारे अवगत करण्यात आलेले आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यामधील आगीच्या वाढत्या घटना रोखण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२१) * १९०७५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यामध्ये ७६६ आगीच्या घटना दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक २२ मार्च, २०२३ या कालावधीमध्ये घडल्या असून त्यापैकी गंभीर स्वरूपातील ११८ मोठ्या १८८ व छोट्या स्वरूपातील ४८० घटनांचा समावेश तसेच ६४ महिला व १४ पुरूषांचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहराची लोकसंख्या ३० लाखांपेक्षा अधिक असून शहरामध्ये टोलेजंग इमारती, मॉल, मोठी रुग्णालये आणि मल्टीप्लेक्स अशा सर्व बहुमजली व सार्वजनिक उपयोगाच्या इमारतीमध्ये आग लागल्यास आग विझविण्याचे मोठे आव्हान अग्निशमन विभागास आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर शहरामध्ये अग्निशमन विभागाकडे सद्यःस्थितीमध्ये एकूण किती अग्निशमनच्या गाड्या आहेत, तसेच त्यातील किती वाहने भंगारामध्ये काढली आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील वारंवार होणाऱ्या आगीच्या घटना रोखण्याबाबत तसेच नागपूर शहरातील लोकसंख्येनुसार जादा अग्निशमनच्या गाड्या उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक ०१/०४/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ या कालावधीत नागपूर शहरात ५०६ लहान आगी २२६ मध्यम आगी व १२७ मोठ्या आगी अशा ८५९ आगीच्या घटना घडल्या आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिका हद्दीबाहेर ५२ आगीच्या घटनेमध्ये अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग महानगरपालिकेद्वारे मदत कार्य करण्यात आले आहे. शहरात घडलेल्या आगीच्या घटनेत एकूण ०६ व्यक्ती जखमी झालेले असून त्यामध्ये ०४ स्त्रिया व ०२ पुरुषांचा समावेश आहे.
(२) नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग त्या-त्या परिस्थितीनुसार अग्निशमनाचे कार्य समर्थपणे पार पाडत आहे.
(३) नागपूर शहरामध्ये अग्निशमन विभागाकडे सद्य:स्थितीत एकूण २१ विविध क्षमतेची अग्निशमन वाहने उपलब्ध असून केंद्र शासनाच्या निदेशानुसार दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी ८ अग्निशमन वाहनाची नोंदणी रद्द केल्याने सदर वाहने भंगारमध्ये काढली आहेत.
(४) शहरातील आगीच्या वारंवार होणाऱ्या घटना रोखण्यासाठी प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत जनजागृती तथा मॉकड्रिलचे नियमित आयोजन करण्यात येते.

• शहरातील उंच इमारत धारक/भोगवटाधारक यांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (२००७) व सुधारीत अधिनियम २०२३ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून उपाययोजनांची पूर्तता करण्याबाबत बाध्य करण्यात आले आहे.

• माहे सप्टेंबर, २०२३ पर्यंत अतिरिक्त ३ अग्निशमन फायर टेंडर अग्निशमन वाहने ताफ्यामध्ये समाविष्ट होणार आहेत.

• नागपूर महानगरपालिकेमार्फत ७० मिटर उंच टर्न टेबल लँडर (TTL) खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई अग्निशमन दलातील जवानांच्या भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२२) * १८९१९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक १७२६३ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलातील जवानांच्या ९१० रिक्त जागांसाठी माहे जानेवारी,२०२३ मध्ये राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत झालेल्या घोटाळ्याची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक १७ मे, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई अग्निशमन दलातील जवानांच्या ९१० रिक्त जागांसाठी राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रियेतील उमेदवारांना न्याय देण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असून त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, भरती प्रक्रियेतील अन्यायग्रस्त उमेदवारांना न्याय देण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मुंबई अग्निशमन दलातील ९१० रिक्त जागांसाठी झालेल्या भरतीचा निकाल बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ११/०५/२०२३ रोजी प्रसारित करण्यात आला. त्यामध्ये अपात्र झालेल्या उमेदवारांचे मुंबई अग्निशमन दलाकडे लेखी अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जांच्या अनुषंगाने १०० पेक्षा अधिक उमेदवारांना महानगरपालिकेमार्फत दूरध्वनीद्वारे कार्यालयात बोलविण्यात आले. तद्नंतर उमेदवारांना त्यांचे अर्ज व व्हिडीओ दाखविण्यात आले असून त्यांचे समाधान झाल्याचे त्यांनी लेखी स्वरुपात लिहून दिले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * १९४२२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहराच्या सभोवताली उद्योगांचे जाळे असून सदर उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्यामुळे तेथील नागरिक त्रस्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदूषणामुळे नागरिकांना दमा व श्वसनाचे विकार होत असल्यामुळे या आजारांच्या रुग्ण संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून नागरिकांच्या आयुर्मानात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चंद्रपूर शहर व परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या दिनांक १३/०७/२०२३ रोजी प्राप्त अहवाला नुसार दमा व श्वसनाचे विकार असलेल्या रुग्णाच्या संख्येत मागील तीन वर्षापासून घट होत आहे.
(३) चंद्रपूर शहराच्या सभोवतालच्या उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते. पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगांवर वेळोवेळी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

चंद्रपूर शहरातील प्रदूषण कमी करण्याकरीता चंद्रपूर शहर कृती आराखड्यानुसार National Clean Air Program (NCAP) अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: सोलापूर, नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना देण्यात येणारे अनुदान निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * १९८११ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातीधर्मातील भेदभाव कमी व्हावा व सामाजिक सलोखा अबाधित राहावा, वृध्दिगंत व्हावा या उद्देशाने आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना शासनाच्यावतीने प्रोत्साहन अनुदान दिले जात असून जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत प्रत्येक जोडप्याला ५० हजार रुपयांचे अनुदान मिळते परंतु सोलापूर जिल्ह्यातील १५० जोडपी अनेक वर्षांपासून सदर प्रोत्साहन अनुदानापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे तथा नोंदणी प्रमाणपत्र जोडून संपूर्ण प्रस्ताव समाज कल्याण विभागास सादर करुनही जिल्ह्यातील ७७५ लाभार्थ्यांना अद्याप अनुदान देण्यात आले नाही तसेच अमरावती जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या पात्र जोडप्यांची जवळपास ६०० प्रकरणे निधी अभावी अनुदान न मिळाल्याने प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर, अमरावती व नागपूर जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना शासनामार्फत प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना राज्यात राबविण्यात येते. सदर योजना ही केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये केंद्र /राज्य ५०: ५० च्या प्रमाणात राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यानंतरच राज्य हिस्सा समप्रमाणात वितरित करण्यात येतो. सद्य:स्थितीत सदर योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण रुपये २७,३१,७६,०००/-इतका निधी प्राप्त झाला असून सदर निधी या योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यासाठी रुपये ८५,००,०००/- अमरावती जिल्ह्यासाठी रुपये १,६५,५०,०००/-व नागपूर जिल्ह्यासाठी रुपये १,८४,५०,०००/- वितरित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर योजनेंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खाजगी अनुदानित शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(२५) * १९३४० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना २४ वर्षांची वरिष्ठ वेतनश्रेणी मिळते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील प्राथमिक खाजगी अनुदानित शिक्षकांना २४ वर्षांची वरिष्ठ वेतनश्रेणी दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समान काम, समान वेतन या तत्वाला बृहन्मुंबई महानगरपालिका डावलत असल्याने प्राथमिक खाजगी अनुदानित शिक्षकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रा.डी.पी.चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शिक्षकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनातील शिक्षकांच्या धर्तीवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तसेच खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळेतील शिक्षकांना दिनांक ०२/०९/१९८९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, दिनांक ०१/०१/१९८६ पासून त्रिस्तरीय वेतनरचना विविध संवर्गात मूळ श्रेणी, वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यात आली. १२ वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर व इतर अटींची पूर्तता होत असल्यास वरिष्ठ वेतनश्रेणी तसेच वरिष्ठ वेतन श्रेणीमध्ये १२ वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर व इतर अटींची पुर्तता होत असल्यास त्या त्या संस्थेतील व संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील २०% पदांना सेवाजेष्ठतेनुसार निवडश्रेणी अनुज्ञेय आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील प्राथमिक खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना, १२ वर्षाची वरिष्ठ वेतन श्रेणी व २४ वर्षांची निवड श्रेणी देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत शाळा व्यवस्थापनास दिनांक २१/०६/२०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले असून त्यानुसार खाजगी शाळा व्यवस्थापनाकडून २४ वर्षाची निवडश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निवडश्रेणी देण्यासाठी मान्यता देण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हळद, सोयाबीन, कापूस, हरभरा, मका,बाजरी, कांदा व इतर पिकांना हमीभाव देण्याबाबत

**(२६) * १९१४८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हरभरा हे रब्बी हंगामातील प्रमुख कडधान्य असून हरभरा पिकाला बाजारात किमान आधारभूत किंमतीपेक्षा (हमीभाव) कमी दर मिळत असल्यामुळे हरभरा उत्पादक शेतकरी आर्थिक

अडचणीत आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, राज्यातील विशेषत: खानदेशात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून हळद, सोयाबीन, कापूस, हरभरा व इतर पिकांना हमीभावापेक्षा कमी भाव मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना खर्चापेक्षा कमी उत्पन्न मिळत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हरभरा, मका, बाजरीची आवक वाढली असूनही मका व बाजरीचे दर हमी भावापेक्षा कमी असल्यामुळे आर्थिक तोटा टाळण्यासाठी खानदेशात हमी भाव केंद्र सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांना हमीभावाची रक्कम मिळावी यासाठी दोन्ही दरातील फरकाची रक्कम वितरित करण्याची मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सन २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत किती शेतकऱ्यांना फरकाची रक्कम अदा केली आहे तसेच खरिपाच्या पेरणीआधी वरील पिकांना विक्री दर व हमी भाव यांच्यातील फरकाची रक्कम शेतकऱ्यांना वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) राज्यात माहे मार्च, एप्रिल व मे च्या सुमारास हरभराचे बाजार भाव हे आधारभुत दरापेक्षा रुपये ५०० ते ७०० प्रमाणे कमी होते. परंतु आधारभुत दर जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये याकरिता केंद्र शासनाने आधारभुत दरानुसार राज्यात चना खरेदीचा निर्णय घेण्यात आला असून सर्व नोडल एजन्सीमार्फत नाफेडच्या वतीने ६१२ खरेदी केंद्रावर दिनांक २७/०२/२०२३ पासून हरभरा खरेदीकरीता शेतकरी नोंदणी सुरु करण्यात आली असून प्रत्यक्षात खरेदी दिनांक १४/०३/२०२३ पासून सुरु करण्यात आली होती. चना खरेदीकरिता मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांकडुन प्रतिसाद मिळाला होता. दरम्यान नोंदणी कालावधीमध्ये राज्यात ५,८२,८३३ शेतकऱ्यांनी चना खरेदीसाठी ऑनलाईन पोर्टलवर नोंदी केल्या होत्या. चना खरेदीची अंतिम दिनांक ११/०६/२०२३ अखेर राज्यात नोंदणी झालेल्या सर्व शेतकऱ्यांकडुन ७७.३२ लाख क्विंटल चना खरेदी करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. शेतकऱ्यांना खरेदीसाठी बोलावुन ३,९२,६२४ शेतकऱ्यांकडुन ७७.३२ लाख क्विंटल चना खरेदी करण्यात आलेला आहे. सदर शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. त्यामुळे हरभरा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आहे असे म्हणता येणार नाही.
(२) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेडच्या वतीने राज्य शासनाने नियुक्त केलेल्या नोडल एजन्सीमार्फत सोयाबीन व कापसाची खरेदी करण्यात येते. परंतु खरेदी कालावधीमध्ये सोयाबीन व कापसाचे बाजारभाव हे आधारभुत दरापेक्षा जास्त असल्यामुळे खरेदी झालेली नाही. तसेच आधारभुत दराने नाफेडच्या वतीने खानदेशात (धुळे, नंदुरबार व जळगांव) १९४३४ शेतकऱ्यांनी चना खरेदीसाठी नोंदणी केली असून १५२४१ शेतकऱ्यांकडुन ३,२२,६९६.६१ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे.
(३) राज्य शासनाच्या वतीने पणन महासंघामार्फत ज्वारी, मका व बाजारी खरेदीकरीता खानदेशात २१ खरेदी केंद्र सुरु करण्यात आले होते. परंतु त्यापैकी फक्त १ खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आली होती.

रब्बी हंगाम मकाची २ शेतकऱ्यांकडुन १००.५० क्विंटल खरेदी करण्यात आली असून बाजरीची खरेदी निरंक आहे.

तसेच केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेडच्या वतीने खानदेशात (जळगांव जिल्हा) हरभरा खरेदीकरीता ४१ खरेदी केंद्रावर १९४३४ शेतकऱ्यांनी चना खरेदीसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी सर्व शेतकऱ्यांना खरेदीसाठी बोलावुन १५२४१ शेतकऱ्यांकडुन ३,२२,६९६.६१ क्विंटल चना हरभरा खरेदी करण्यात आलेला आहे.

(४) शेतकऱ्यांना हमीभावाची रक्कम मिळावी यासाठी दोन्ही दरातील फरकाची रक्कम वितरित करण्याची मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सन २०२३ मध्ये वा दरम्यान केली आहे याबाबत शासनास निवेदन प्राप्त झालेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आळंदी व देहू या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असणाऱ्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ झाली असल्याबाबत

**(२७)** * **१९९८८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी व देहू या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असणाऱ्या इंद्रायणी नदीच्या प्रदुषणात दिवसेंदिवस अधिकच वाढ होत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आळंदी व देहू येथे भेट देताना वारकरी संप्रदायाच्या प्रथेप्रमाणे वारकरी प्रथम इंद्रायणी नदीत स्नान करून नंतर माऊलींचे दर्शन घेत असल्याने नाईलाजास्तव प्रदूषित इंद्रायणी नदीत स्नान करून तेच पाणी तीर्थ म्हणून प्राशन करित असल्याने लाखो भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंद्रायणी नदी प्रदूषित होण्यास कारणीभूत असणाऱ्या या परिसरातील कारखान्यांवर कारवाई करून इंद्रायणी नदीचे प्रदूषण थांबवून ते कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, आळंदी व देहू येथून पंढरपूरकडे जाणाऱ्या वारीमार्गावर होणारे अपघात, वारकऱ्यांकरिता असलेल्या पालखी मार्गाची दुरवस्था यामुळे वारकरी संप्रदायातील भक्तांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भाविकांना अनवाणी पायांनी चालताना त्रास होवू नये म्हणून तिरूपती देवस्थानाप्रमाणे वारीमार्गावर देखील सफेद रंग मारणे, वारी मार्गाची योग्य ती दुरूस्ती करणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

इंद्रायणी नदीच्या काठावर असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातून विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी मिसळत असल्याने नदीच्या पाण्याची गुणवत्ता खालावल्याचे आढळून येते.

(२) हे खरे नाही.

(३) देहू नगरपंचायत हद्दीतील विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी इंद्रायणी नदीत मिसळल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेला दिनांक ३१/०५/२०२३ ला प्रस्तावित निर्देश व दिनांक ०६/०७/२०२३ रोजी अंतरिम निर्देश बजावून आवश्यक ती खबरदारी व उपाययोजना करण्याबाबत निर्देशित केले आहे.

इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी विविध उपाय योजनांचा समावेश " नमामि चंद्रभागा" अभियानांतर्गत असून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) व (५) आळंदी व देहू शहरामध्ये असलेल्या पालखी मार्गाचे डांबरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच पालखी मार्गाची काही दुरुस्तीची कामे असल्यास सदरची कामे ही कंत्राटदारामार्फत तातडीने करण्यात येतात.

देहू नगरपंचायतमार्फत पालखी मार्गावरती अनवाणी चालताना वारकरी व भाविक भक्तांना त्रास होवू नये याकरिता जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळयादरम्यान पांढरा रंग पालखी मार्गावर मारणेकामी कंत्राटदाराची नेमणुक करण्यात आली असून सदर कंत्राटदारामार्फत पालखी मार्गावर पांढरा रंग मारण्याचे काम करण्यात येते. तसेच नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीतील वारी मार्गिकेची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावांना सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(२८) * १९२९० श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१६८ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावातील १८ नागरी सुविधा अपूर्णावस्थेत असून नवीन कामांचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असून उर्वरित कामांकरिता आवश्यक असलेला रुपये १३.३२ कोटींचा निधी प्रकल्प यंत्रणेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरही वितरित करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हतनूर प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाच्या नवीन कामांना तात्काळ मंजुरी देऊन पूर्ण झालेल्या कामांचा उर्वरित निधी उपलब्ध करून देणे तसेच मांगलवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) गावाचे विशेष बाब म्हणून हतनूर प्रकल्पांतर्गत पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांदलवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील प्रकल्पग्रस्तांनी रहिवासासाठी भूखंड मिळावा म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी हतनूर जलाशयात केलेल्या जलसमाधी आंदोलनाचे वेळी प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाची कार्यवाही दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात येऊनही अद्यापपावेतो प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हतनूर प्रकल्पग्रस्त व तांदलवाडी येथील रहिवाशांना भूखंड देण्यासह प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन नागरी सुविधा उपलब्ध

करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे नाही. हतनूर धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावातील नागरी सुविधा कामांकरिता प्राप्त निधी मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र, दिनांक ८ मार्च, २०२३ व स्मरणपत्र दिनांक ३ जुलै, २०२३ अन्वये त्रुटी पूर्तता करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांना कळविण्यात आले आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे. मौजे मांगलवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) या गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) तांदलवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपकामी दिनांक १३/०४/२०२३ रोजी सोडत आयोजित करण्यात आली होती. परंतु लाभार्थ्यांच्या यादीबाबत ग्रामस्थांनी हरकत घेतल्याने मौजे तांदलवाडी येथील अभिन्यासात भूखंड वाढवून सुधारित अभिन्यास मंजूर करण्यासाठी सहायक संचालक नगररचना जळगाव यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक १३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सहायक संचालक नगररचना जळगाव यांनी दिनांक ०६/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुधारित अभिन्यास सादर केला असून त्याप्रमाणे भूखंडनिहाय प्रत्यक्ष सीमांकन करून प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

हतनूर धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावातील नागरी सुविधा कामांकरिता प्राप्त निधी मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून त्रुटी पूर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर निधी वितरित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबईतील बेस्ट बसेसवर लावलेल्या जाहिरातींमुळे अपघाताचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(२९) * १९६५३ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबईतील बेस्ट बसेसवर लावलेल्या जाहिरातींमुळे बस वरील रिफ्लेक्टीव्ह टेप्स (प्रतिबिंबित टिपा) झाकल्या जात असल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो, याची दखल घेत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने बेस्टच्या ८९ बसेस वर कारवाई केली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसेसवर लावण्यात येणाऱ्या जाहिरातींसाठी परिवहन विभागाने कोणते निकष ठरविले आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेस्टच्या बसेस वर आकारलेला दंड वसूल करण्यासाठी परिवहन विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १४/०४/२०२३ व दिनांक २१/०४/२०२३ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम, १९८९ च्या नियम १३४ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार नमूना PDAA मध्ये अर्ज सादर केल्यानंतर सदर नियमांच्या नियम १३४-A च्या तरतुदीनुसार विहित शुल्क आकारले जाते. त्यानंतर उक्त नियमांतील तरतूदीनुसार परिवहन संवर्गातील वाहनांवर जाहिरात प्रदर्शित करण्याबाबत परवानगी देण्यात येते.
(३) मुंबई विभागातील प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत सन २०२३ मध्ये सदर प्रकरणी ३३२ वाहनांची तपासणी करण्यात आली असून त्यात २०८ दोषी वाहने आढळली आहेत. सदर वाहनांवर केंद्रीय मोटार वाहन नियम,१०४ व १७७ अन्वये कारवाई करुन वाहनांना ई-चलान जारी करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर नगरपरिषदेंतर्गत नागरिकांच्या पाणीटंचाईची समस्या दूर करण्याबाबत

**(३०) * १९६२८ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने आवश्यक पाणी पुरवठ्याची सोय जुनीच असल्याने शहरातील बहुतांश भागात दोन तर काही भागात सहा दिवसांनी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना रखरखत्या उन्हात पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील रसायनयुक्त पाणी लगतच्या नदी-नाल्यात सोडल्याने शहर व परिसरातील जमिनीतील पाणी दूषीत झाल्याने शहरातील सर्व जलस्त्रोत कायमचे निकामी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील नागरिकांना होत असलेल्या अशुध्द पाणी पुरवठ्यांमुळे विविध आजार तथा आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असल्याने शुध्द पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत व नविन जलस्तोत्र निर्माण करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

कळमेश्वर-ब्राम्हणी शहरास नगरपरिषदेकडून कळमेश्वर भागात एक दिवसाआड व ब्राम्हणी भागात दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येतो.
(२) हे खरे नाही.

कळमेश्वर-ब्राम्हणी शहरालगत कळमेश्वर औद्योगिक वसाहत असून सदर वसाहतीमध्ये कार्यरत उद्योगामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता उद्योगाच्या परिसरात औद्योगिक सांडपाणी संनियंत्रण यंत्रणा कार्यान्वित आहे.

सदरच्या औद्योगिक क्षेत्रातील सांडपाण्यामुळे जलस्त्रोत प्रदूषित होत असल्याबाबत कोणतीही तक्रार एम.आय.डी.सी. कडे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त नाही.

(३) कळमेश्वर-ब्राम्हणी नगरपरिषदेचे ५.४० दशलक्ष घनमीटर क्षमतेचे स्वतंत्र जलशुद्धीकरण केंद्र असून याद्वारे पाण्याचे शुद्धीकरण करुन शहरास पाणीपुरवठा करण्यात येतो.

शहराला पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची महिन्यातून २ वेळा प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर यांचेकडून तपासणी करण्यात येते.

शासनाने दिनांक २७/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, कळमेश्वर-ब्राम्हणी शहरासाठी रुपये ६०.९३ कोटी किंमतीची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर केली असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांचे रासायनिक सांडपाणी प्रक्रियेविना कासाडी नदीत सोडण्यात येत असल्याबाबत

**(३१) * १९६७५ श्री.जयंत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक विकास विभागातील कारखान्यांतील रासायनिक सांडपाणी प्रक्रियेविना कासाडी नदीत सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यांतून नदीत सोडण्यात येणाऱ्या घातक रसायनांमुळे कासाडी नदीच्या किनारी भागातील गवत आणि छोटी झाडेही जळून गेली असून, पडघे गावातील २ म्हशींपैकी एकीचा कासाडी नदीचे पाणी पिण्याने मृत्यू झाला तसेच पाण्याचा स्पर्श झाल्याने तिचे शरीर जळल्याची घटना दिनांक ८ मे, २०२३ रोजी त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यांतून नदीत व हवेत सोडण्यात येणाऱ्या घातक रसायनांमुळे तसेच हवेतील घातक वायुमुळे नदीचे पाणी, हवा अत्यंत दूषित झाल्याने परिसरातील नागरिकांसह जनावरांचे ही आरोग्य धोक्यात आले असून या प्रदूषणामुळे नागरिकांना अस्थमा, हृदयाचे आजार झाले असून लहान मुलांच्या वाढीवरदेखील विपरित परिणाम होत आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तळोजा औद्योगिक क्षेत्रातून रात्रीच्या वेळी सोडण्यात येणाऱ्या या रसायनांच्या उग्रवासामुळे तळोजा, नावडे, रोडपाली, खारघर परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास अडथळा होत असून रात्री झोप न येण्यासारखे अनेक त्रास रहिवाशांना होत असल्याने काही सामाजिक संस्थानी लोकायुक्तांकडे याबाबत तक्रार दाखल केली असून लोकायुक्तांच्या सूचनेप्रमाणे प्रदूषण महामंडळ आणि पनवेलच्या तहसिलदार कार्यालयाच्या पथकाने केलेल्या पाहणीत तळोजा औद्योगिक परिसर आणि जवळपास गावे आणि वसाहतीत केलेल्या पाहणीत उग्रवास येत असल्याचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) प्रश्नाधिन विषयाबाबतची तक्रार वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल व वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रूग्णालय, पनवेल यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली नसल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल व वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रूग्णालय, पनवेल यांनी कळविले आहे.
(४) प्रश्नाधिन विषयाबाबत मा.लोकायुक्त यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली असून प्रकरण प्रलंबित आहे.
(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तळोजा औद्योगिक वसाहतीच्या करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान मागील वर्षात हवा व जल प्रदूषण करणाऱ्या १२ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. तसेच विशेष पाहणी पथकामार्फत एप्रिल २०२३ मध्ये करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान हवा प्रदूषण सयंत्रणेत त्रुटी आढळलेल्या ५ उद्योगांवर उत्पादन बंदचे आदेश पारित करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुलतानवाडी (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३२) * १८८१७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुलतानवाडी (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथे सामाजिक न्याय विभागामार्फत १०० खाटांचे मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाचे बांधकाम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये निविदा काढून मे. पुजा असोसिएट्स यांना या इमारतीचे बांधकाम देण्यात येऊन सदर कामासाठी रुपये ७ कोटी ७ लाख ६२ हजार एवढा खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पूजा असोसिएट्स या कंपनीने सुलतानवाडी येथील वसतिगृह बांधकामाचे काम विहीत वेळेत पूर्ण न केल्यामुळे अद्यापही सदर वसतिगृहाची इमारत अपूर्ण असून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता आला नूसन याप्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी दुर्लक्ष केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १२/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुलतानवाडी येथील मुलांचे वसतिगृह बांधकामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर कामाकरिता रुपये ९,३७,९४,७६९/- इतका संपूर्ण निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा प्रक्रिया करून सन २०२१ मध्ये पुजा असोसिएटस, पुणे या कंपनीस वसतिगृहाचे बांधकाम करण्याकरीता कार्यारंभ देण्यात आला होता.तथापि, पुजा असोसिएटस, पुणे या कंपनीने मुदतवाढ व भाव वाढीसाठी मागणी करण्यात आली होती तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने मुदतवाढ व भाववाढ दिलेली नाही. तसेच पुजा असोसिएटस कंपनीला दिलेला कार्यारंभ आदेश रद्द करणेबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंचवड (जि.पुणे) येथील संभाजीनगरमध्ये उभारण्यात येणारे निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाचे नुतनीकरण करणेबाबत

**(३३)** * **१८९७० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचवड (जि.पुणे) येथील संभाजीनगरमध्ये एमआयडीसीच्या सात एकर जागेमध्ये उभारण्यात येणारे निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय नुतनीकरणाअभावी गत सहा वर्षांपासून बंद असून उक्त प्राणिसंग्रहालयाकरीता २० कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात येऊनही ते अदयाप पर्यटकांकरीता खुले करण्यात आले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राणिसंग्रहालयाच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण करून पर्यटकांसाठी खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदर काम अदयाप प्रलंबित ठेवणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत : खरे आहे.

या प्रकल्पासाठी रुपये १९,६१,०२,९३४/- इतका खर्च झालेला आहे. Central Zoo Authority च्या नियमाप्रमाणे अद्यापही काही कामे बाकी असल्याने प्राणीसंग्रहालय खुले केलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(२) निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाच्या कामासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागार मे.जैन ॲण्ड असोसिएट्स यांची उर्वरित कामासाठी सल्लागार म्हणून नेमणूक रद्द करण्यात आलेली आहे. या प्राणिसंग्रहालयाच्या उर्वरित कामासाठी मे.मॅड ओव्हर फिश या नविन सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.

प्राणिसंग्रहालय खुले करण्याच्या दृष्टीने Central Zoo Authority च्या नियमांनुसार उर्वरित कामांसाठी व नविन नेमण्यात आलेले मे.मॅड ओव्हर फिश यांनी सुचविलेले नुतनीकरणाची व इतर कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आली असून निविदा स्विकृती कार्यवाही सुरू आहे. सदरचे काम लवकर सुरू करण्यात येणार असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील आगारांमधील बसगाड्या नादुरुस्त असल्याबाबत

**(३४) * १९५२६ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील बस आगारांमध्ये नादुरुस्त व भंगार बसगाड्या कार्यरत असल्यामुळे मेळघाट, पतरवाडा, चांदूरबाजार या ठिकाणी प्रवास करणाऱ्या कर्मचारी व प्रवाशांना त्रास होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील बस आगारांसह राज्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात प्रवाशांच्या सोईसाठी नवीन व पर्यावरणपुरक बसेस खरेदी करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नवीन ५३०० ई-बसेस खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु असून त्यापैकी १५० ई-बसेस करिता पुरवठादारासमवेत करार करण्यात आला असून ५१५० ई-बसेस करीता निविदा प्रक्रिया प्रगत करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यासह अमरावती जिल्ह्यातील बस आगारांमध्ये नवीन बस गाड्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) व (३) होय.

(४) व (५) अमरावती विभागामार्फत एकूण ३२१ नियते ई-बससाठी प्रस्तावित करण्यात आली आहेत. ई-बसेस उपलब्ध होताच विभागांच्या आवश्यकतेनुसार देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत रस्ते रुंदीकरणातील बाधितांच्या पुनर्वसनाच्या नावाखाली अतिरिक्त एफएसआयचा लाभ घेणाऱ्या विकासकांची चौकशी करण्याबाबत

**(३५) * २०४२८ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून रस्ते रुंदीकरणात अडसर ठरणाऱ्या झोपडीधारकांना हटवून रस्ते रुंदीकरणाची मोहीमेमुळे बाधित होणाऱ्या कुटुंबाचे आपल्या प्रकल्पात सदनिका देण्याची तयारी दर्शवणाऱ्या विकासकाला महापालिकेच्या ३ (१२) वी अंतर्गत अतिरिक्त एफएसआय चा लाभ दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ झोपडीधारकाला याचा लाभ देण्याच्या ऐवजी काही विकासकांनी त्या झोपड्या नाममात्र दरात आपल्याच माणसाच्या नावावर खरेदी करून पीएपीच्या सदनिका हस्तगत करुन महानगरपालिकेची मोठी फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकांनी या प्रकल्प बाधितांच्या सदनिका स्वतःचे नातेवाईक, श्रीमंत व्यक्तींच्या नावे दाखवून त्या यादीला महानगरपालिकेची मंजुरी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरीब गरजू व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या नावाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून चार एफएसआयचा लाभ घेणाऱ्या विकासकांनी प्रत्यक्षात गरिबांच्या सदनिका शिव (सायन), माटुंगा, वडाळा तसेच माहीम, दादर, धारावी, खार (पश्चिम) या भागातील श्रीमंतांना वितरित करून महानगरपालिकेची फसवणूक करणाऱ्या संबंधित अधिकारी, लाभार्थी व विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) विकास नियोजन आराखडा २०३४ मध्ये ३३ (१२) बी या नियमावलीचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये, रस्ता रुंदीकरणात / प्रस्तावित रस्त्यावरील / रस्ता संरेखनात बाधित होणाऱ्या सहनशील / संरक्षीत / निवासी / अनिवासी बाधितांना महानगरपालिकेच्या त्याच प्रशासकीय विभागात पुनर्निवासीत करण्याचे प्रस्ताविले आहे.

त्यानुषंगाने, महानगरपालिकेच्या दिनांक १८/०३/२०२१ व २०/०६/२०२३ रोजीच्या परिपत्रकाच्या अधिन राहून आणि शासनाने / प्रशासनाने वेळोवेळी पारित केलेल्या पात्रता व अपात्रता निकषानुसार सक्षम प्राधिकारी सुनावणी घेऊन पात्र / अपात्रतेचा निर्णय घेतात. बाधित झोपडीधारकांनी त्याच्या स्वेच्छेनुसार विकासक आणि झोपडीधारकांचे संमतीपत्र सादर केल्यानंतर पात्रतेच्या निकषाप्रमाणे व त्याच्या पात्र झोपडीच्या / बांधकामाच्या निष्कासनासापेक्ष पर्यायी सदनिका मिळण्याकरीता बाधित झोपडीधारक पात्र होतो.

महानगरपालिकेच्या हद्दीतील झोपडीधारक / रहिवाशी यांच्या वैयक्तिक मालमत्तेचे खरेदी-विक्री व्यवहार हे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियंत्रित केले जात नाहीत.
(४) गरीब गरजू व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या नावाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून चार एफएसआयचा लाभ घेणाऱ्या विकासकांनी प्रत्यक्षात गरिबांच्या सदनिका शिव (सायन), माटुंगा, वडाळा तसेच माहीम, दादर, धारावी, खार (पश्चिम) या भागातील श्रीमंतांना वितरित केल्याची तक्रार महानगरपालिकेच्या एफ/दक्षिण, एफ/उत्तर, जी/उत्तर व एच/पश्चिम विभागास प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यासह काजूला हमीभाव देण्याबाबत

**(३६)** * **२०४३४ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्याची आणि काजू फळ विकास योजना राबवण्याची घोषणा सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील भाषणात केली असून अद्यापही या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंबा फळपिकासाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करावे, काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करावी व गोवा राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांकरीता राबविण्यात येत असलेल्या किमान हमी भाव योजनेच्या धर्तीवर राज्यातही काजूला किमान हमी भाव लागू करावा, अशी मागणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांनी त्यांच्या दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आंबा फळपिकासाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करावे, काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करावी व गोवा राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांकरीता राबविण्यात येत असलेल्या किमान हमी भाव योजनेच्या धर्तीवर राज्यातही काजूला किमान हमी भाव लागू करावा याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

वित्त मंत्री यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पिय भाषणामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १६/०५/२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील काजू फळ पिकाच्या विकासाकरिता "महाराष्ट्र राज्य काजू मंडळ" स्थापन करण्यात आले असून, त्याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(२) होय, हे खरे आहे.

तत्कालीन विधानसभा विरोधी पक्षनेते यांनी त्यांच्या दिनांक २७/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास मागणी केलेली आहे.
(३) काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. आंबा बोर्ड स्थापनेबाबतचा प्रस्ताव पणन मंडळाकडून मागविण्यात आला आहे. तसेच काजूला हमी भाव देणे हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील असून, तत्कालीन विरोधी पक्षनेते यांच्या मागणीच्या अनुषंगाने केंद्र शासनास दिनांक १२/०७/२०२३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चारही प्रादेशिक कार्यालयांत शालेय बसची तपासणी प्रलंबित असल्याबाबत

**(३७)** * **२०४६४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १३७६६ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी राज्य शासनाने काटेकोर नियमावली लागू केली असून सदरहू नियमावलीच्या अंमलबजावणीकडे संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केल्याने मुंबईतील चारही प्रादेशिक कार्यालयात शेकडो शालेय बसची तपासणी प्रलंबित असल्याचे दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाकडे दुर्लक्ष करून शालेय बसची तपासणी न करणाऱ्या संबंधितांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शालेय बसची तपासणी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १४/०६/२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६/०४/२०२३ रोजी जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये अध्यक्ष, जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती यांनी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बस/स्कूल व्हॅन ही वाहने वैध कागदपत्राशिवाय व स्कूल बस नियमावलीमधील तरतुदींचे पालन न करणाऱ्या वाहनांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत वायुवेग पथकांना सूचना दिल्या आहेत. त्यानुसार वायुवेग पथकांमार्फत स्कूल बस/स्कूल व्हॅन व विद्यार्थी वाहतूक करणारे अवैध वाहने अशा एकूण ३६७५ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून ६५७ दोषी वाहन धारकांकडून रुपये ३०,२३,७००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खाजगी ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांना जादा तिकीट दर आकारला जात असल्याबाबत

**(३८) * १८८८० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५२६० ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हाळी सुट्टीदरम्यान एस.टी. व इतर सार्वजनिक वाहतूकीचे आरक्षण पूर्ण झाल्यामुळे खाजगी ट्रॅव्हल्स वाहतूकदार प्रवाशांकडून जादा तिकीट दर आकारत असून सदर प्रकरणी प्रवाशांची तक्रार आल्यानंतर कारवाई करण्यात येईल असे आरटीओकडून सांगण्यात आले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिकीट दरांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रादेशिक परिवहन विभागाची असतानाही कोकण, पश्चिम महाराष्ट्र, नागपूर, औरंगाबाद येथे जाणाऱ्या गाड्यांचे तिकीट दर रुपये २००० पर्यंत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जादा दर आकारून प्रवाशांची लुट करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांवर कारवाई करून तिकीट दरावर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १०/०५/२०२३ व दिनांक १३/०५/२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) व (३) शासनाने विहित केलेल्या भाडेदरापेक्षा जास्त भाडेदर आकारल्यास खाजगी कंत्राटी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसवर कारवाई करण्यात येते.

राज्यातील खाजगी कंत्राटी प्रवासी बसेसची तपासणी व मनमानी भाडे आकारण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक १५/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांना विशेष तपासणी मोहिम राबविण्याबाबत निर्देश जारी केले आहेत.

सदर तपासणी मोहिमेमध्ये जादा भाडे आकारणाऱ्या ४० बसेसवर कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हतनूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत

**(३९) * १८८६९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हतनूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) गावालगत गट क्र.३२० मध्ये सन १९९१ मध्ये शिवना नदीवर केटी बंधाऱ्याचे काम करण्यात आले असून बंधाऱ्यामुळे आजुबाजूच्या विहीरींच्या पाणी पातळीत वाढ झाली तसेच किमान १०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे पुराच्या पाण्यामुळे कोल्हापुरी बंधारा वाहून गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडे वारंवार मागणी करूनही बंधाऱ्यांची दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कोल्हापुरी बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देऊन दुरुस्ती करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, मूळ को. प. बं. बांधकाम सुस्थितीत असून बांधकामास कसलेही नुकसान पोहचले नाही. परंतु अतिवृष्टीमध्ये आलेल्या पुरांमुळे शिवना नदीवरील इतर को.प.बंधाऱ्याचे पाश्र्ववहन झाल्याने आकस्मिक आलेल्या पुरामुळे बंधाऱ्याच्या डाव्या व उजव्या नदीतिरांकडीलजमिनीचे पाश्र्ववहन झालेले आहे.

(३) होय.

(४) सदर बंधारा दुरुस्तीचे काम मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेच्या आराखड्यांत समावेश करण्यात येणार असून कामाचे दुरुस्ती अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्याची अंदाजित किंमत रुपये १५५.०३ लक्ष एवढी आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४०) * १९०९९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १५९१८ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या करीत असल्याने या गंभीर समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त यांनी आत्महत्येची नेमकी कारणे व त्यावरील उपायांबाबत सर्व्हेक्षण मोहीम राबविली असून शेतकऱ्यांना प्रती हंगाम एकरी दहा हजार रुपये आर्थिक

मदत, शेतकऱ्यांच्या पहिल्या दोन मुलींना लग्नासाठी मदत, शेत रस्त्यांचे मजबुतीकरण, डांबरीकरण, शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा आरोग्य विमा उतरविणे, नदी जोड प्रकल्प, मार्केट रिफॉर्मस व इतर उपाययोजनांचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात मागील ५ महिन्यांत ३९१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यातील ५७ शेतकऱ्यांच्या वारसांना निकषात बसत नसल्याने प्रशासनाने मदत नाकारली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने वरील शिफारशीपैकी कोणत्या उपाययोजना स्वीकृत केल्या आहेत, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी तसेच त्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.: एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३/०१/२००६ अन्वये सततची नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या कारणांमुळे शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास मदत व पुनर्वसन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे, औरंगाबाद विभागातील दिनांक १ जानेवारी, ते दिनांक ३१ मे, २०२३ या कालावधीत ५७ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची प्रकरणे या निकषात न बसल्याच्या कारणास्तव अपात्र ठरविण्यात आल्याने मदत देता आली नाही.

(३) तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी मदत व पुनर्वसन विभागाकडे दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये याबाबत सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर कृषी विभागाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे सदर अहवाल कृषी विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

(४) शेतकरी आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने विविध विभागामार्फत खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-

१. कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना राबविल्या जातात.
२. विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.
३. शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन कार्यरत आहे.
४. शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना व प्रोत्साहन योजना राबविण्यात आली.

५. शेतकऱ्यांना केवळ १.०० रुपये भरून पीक विमा योजनेचा लाभ देण्याकरीता "सर्वसमावेशक पीक विमा योजना" सन २०२३-२४ पासून राबविण्यास दिनांक २३ जून, २०२३ च्या कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

६. राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६०००/- शेतकऱ्यांना देण्यासाठी नमो किसान शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

७. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून मदत दिली जाते.

नियमानुसार पात्र ठरलेल्या शेतकरी आत्महत्यांप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते. पात्र प्रकरणी प्रत्येकी रुपये १.०० लक्ष प्रमाणे मदत देण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत विविध शैक्षणिक बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती रक्कमेतील तफावत दूर करणेबाबत

**(४१) * २००६९ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाचे वतीने कल्याणकारी योजनेंर्तगत दहावी व बारावीच्या वेगवेगळया बोर्डाच्या (शिक्षण मंडळ) गुणवंत विद्यार्थ्यांना वेगवेगळी शिष्यवृत्ती म्हणून प्रोत्साहन बक्षिस रक्कम दरवर्षी देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत एसएससी बोर्डाच्या दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना १० हजार रुपये व १५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत असताना तेवढेच गुण प्राप्त केलेल्या सीबीएससी आणि आयसीएससी बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना दहावी व बारावीसाठी अनुक्रमे फक्त पाच हजार रुपये व साडेसात हजार रुपये शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येत असल्याचे दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वांना समान न्याय या तत्वास अनुसरुन एस.एस.सी. बोर्ड, सीबीएससी बोर्ड आणि आयसीएससी बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना भेदभाव न करता शिष्यवृत्तीची समान रक्कम अदा करण्यात यावी, अशी मागणी तेथील मा.स्थानिक लोकप्रतिनिधीनी, महानगरपालिका प्रशासन, मा.मुख्यमंत्री तसेच मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग (२) यांचेकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.लोकप्रतिनिधीच्या मागण्यांसदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

श्रीमती अश्विनी लक्ष्मण जगताप, मा.विधानसभा सदस्य व श्रीमती शैलजा अविनाश मोरे, माजी नगरसदस्य यांचे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे.

(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र बोर्ड (SSC Board) शाळेतील प्रवेशाबाबत कल वाढावा, त्यांना प्रोत्साहान मिळावे व मातृभाषेचे शिक्षण मिळावे या कारणास्तव इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये ८० टक्के पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस रक्कम देणे योजनेमध्ये बदल करण्यात आलेला असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ. हिवरखेड (ता. तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत

**(४२) * १९६०७ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १७३६१ ला दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी दिनांक १३ जून, २०२२ रोजी घोषणा करण्यात आली असून, शासनाने हिवरखेड नगरपंचायतीची अंतिम अधिसूचना निर्गमित करणे अपेक्षित असताना शासनस्तरावरील अधिकाऱ्यांवर मा.लोकप्रतिनिधीकडून दबाव आणल्यामुळे शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हिवरखेड नगरपंचायत संदर्भात दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थगिती आदेश काढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.हिवरखेड ग्रामपंचायतीमध्ये राहणारे नागरिक हे दुर्बल घटकातील असून ९० टक्के लोकांचे उदरनिर्वाह हे शेती व मजुरी यावर निर्भर असल्याने हिवरखेड ग्रामपंचायतीचे अस्तित्व कायम ठेवण्याचे तसेच शासनाने केलेली प्राथमिक उद्घोषणा रद्द करण्याच्या मा. लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये हिवरखेड नगरपंचायत करण्याबाबतची पुढील कार्यवाही स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्थगिती आदेशाविरोधात स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच हिवरखेड विकास मंचातर्फे मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी निवेदन देण्यात आले असून राष्ट्रीय जनगणना आयोगाने ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रात बदल करावयाचा असल्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पूर्वी करुन घ्यावा असे निर्देश शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हिवरखेड ग्रामपंचायतीची विद्यमान लोकसंख्येनुसार प्रस्तावित हिवरखेड नगरपंचायतऐवजी नगरपरिषद करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली असून यासंदर्भातील सर्व बाबी तपासून शासनास अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी, अकोला यांना दिनांक २० जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मौ. हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) शासनाने अकोला जिल्ह्यातील हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत दिनांक १३ जून, २०२२ रोजी प्राथमिक उद्घोषणा निर्गमित केली होती. दरम्यान त्यावर नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले असून त्या व्यतिरिक्त मा.लोकप्रतिनिधी यांनी, सदर ग्रामपंचायतीमध्ये राहणारे नागरिक दुर्बल घटकातील असून ९० टक्के लोकांचे उदरनिर्वाह हे शेती व मजूरी यावर निर्भर असल्याने हिवरखेड ग्रामपचांयतीचे अस्तित्व कायम ठेवण्याची तसेच शासनाने निर्गमित केलेली प्राथमिक उद्घोषणा रद्द करण्याची विनंती केली होती. सदर बाबी विचारात घेऊन शासनाने दिनांक ९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये हिवरखेड नगरपंचायत करण्याबाबतची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.
(३) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन तसेच हिवरखेड विकास मंच यांचे दिनांक १४/११/२०२२ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

महारजिस्ट्रार, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक ३०/६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास कळविल्यानुसार सर्व जिल्हे / शहरे / गावे यांच्या प्रशासकीय सीमा जनगणनेकरीता गोठविण्यास दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून दिनांक ३ मे, २०२३ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार हिवरखेड ग्रामपंचायतीची विद्यमान लोकसंख्या २५,००० पेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास येत असल्याने व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम-३ मधील तरतूदीनुसार नगरपंचायत ऐवजी नगरपरिषद गठीत करण्यास निकष पूर्ण करीत असल्याने शासनाने हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतची प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेत ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीने गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३)** * **१८८८२ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-निजामपूर महानगरपालिकाने भुयारी गटारासाठी स्कीम फेज-२ अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत भुयारी गटारी योजनेचे व मल:निसारणाचे काम योग्य प्रकारे व नियोजनबध्द पध्दतीने करता यावे म्हणून कन्सल्टंट व शासनाकडून देखरेख म्हणून ५ संस्थांची नेमणूक केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भुयारी गटार योजनेची निविदा ४६२ कोटी रुपयांची असून त्यापैकी ६ एचटीपी, १० पंपिंग स्टेशन व नादुरुस्त केलेली रस्ते बांधण्याची निविदा झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकाम होण्यापूर्वी ४ संस्थांनी व महानगरपालिकेने ३३७ कोटी रुपये ठेकेदार असलेल्या ईगल कन्स्ट्रक्शन यास गैरव्यवहारातून अदा केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भुयारी गटार योजना ही शासकीय योजना न राबविता सदर निविदेमध्ये ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्ते नादुरुस्त होऊन २००० लोकांचे अपघात झालेले असून भुयारी गटार योजनेमध्ये अनियमितता आढळून आल्याने याची सखोल चौकशी होण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी,२०२३ रोजी मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असून शासनाने याबाबत समिती नेमून सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ करीता तांत्रिक सल्लागार (पीएमसी) म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक केलेली आहे.
(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ प्रकल्पाची मंजूर किंमत रुपये ४२७.९८ कोटी असून सदर योजनेमध्ये ४ मलप्रक्रिया केंद्र (एसटीपी), ७ पंपिंग स्टेशन व १५९ किमी मलवाहिनी अंथरणे व खोदाईमुळे नादुरुस्त झालेले रस्ते पूर्ववत करणे ही मुख्य उपांगे निविदेमध्ये समाविष्ट आहेत.
(३) व (४) भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सुरु असलेल्या कामांचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे असून त्यांच्यामार्फत सदर प्रकल्पाचे झालेल्या कामाचे मोजमाप व गुणवत्ता तपासली जाते. तसेच, सदर कामाचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्यामार्फत वेळोवेळी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून काम समाधानकारक असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित ठेकेदारास रुपये ३८६.८८ कोटी रुपयांची देयके प्रदान केलेली आहेत.
(५) व (६) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ प्रकल्पाच्या कामाच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शासनास निवेदन प्राप्त झालेले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर विषयाच्या अनुषंगाने शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागातील पदभरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(४४) * १९४९१ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७८०७ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागातील प्रलंबित भरती सुरू करण्यासाठी पात्र उमेदवार दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी उपोषणाला बसले असता दोन महिन्यांमध्ये पदभरती करण्यासंदर्भात आश्वासन देऊनही महामंडळ प्रशासनाकडून काहीच कार्यवाही न झाल्यामुळे हे उमेदवार पुन्हा आंदोलन करणार असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१९ मध्ये परिवहन महामंडळाने दुष्काळग्रस्त भागातील मुलांसाठी १२ विभागातील ४४१६ चालक तथा वाहक पदांची भरती सरळसेवेने करण्यासाठी जाहीरात काढण्यात येऊन पुणे विभागाने उमेदवारांची लेखी परीक्षा, कागदपत्र छाननी, वैद्यकीय चाचण्या घेऊन २९८२ मुलांना दिनांक १७ जानेवारी, २०२० पासून भोसरी येथे वाहन चाचणीसाठी बोलावून २३०० मुलांची चाचणी झाल्यानंतर सदर भरती प्रक्रिया झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पात्र मुलांची वयोमर्यादा पूर्ण होत असल्यामुळे प्रलंबित मुलांच्या चाचण्यासह भरतीप्रक्रिया पूर्ण करून अंतिम निवड यादी जाहीर करण्यासाठी उमेदवारांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव यासह परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने पुणे विभागातील चालक-वाहकांची भरती प्रक्रिया पूर्ण करुन अंतिम निवड यादी जाहीर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) उपोषणाबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२), (३), (४) व (५) रा.प. पुणे विभागातील सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांपैकी प्रलंबित ९४८ उमेदवारांची संगणकीकृत वाहन चालन चाचणी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी पासून घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसारीत करणेबाबत व त्यानंतर उत्तीर्ण व पात्र उमेदवारांना रिक्त जागेनुसार सामावून घेणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील उड्डाणपुलांखाली रस्त्यांच्या बाजूला जुनी आणि गुन्हयांमध्ये वापरलेल्या वाहनांची लिलाव प्रक्रिया राबविण्याबाबत

**(४५) * १९५३३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील उड्डाणपुलाखाली, रस्त्यांच्या बाजूला जुनी आणि गुन्हयांमध्ये वापर केलेली अनेक वाहने उभी केली जात असल्याने पादचाऱ्यांसह अन्य वाहनचालकांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उड्डाणपुलाखाली, रस्त्याच्या बाजूला उभी असलेली बेवारस ५,५५५ वाहने जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही वाहनांचे मालक येऊन वाहने घेऊन जातात, परंतु काही वाहनांचे मालक पुढे येत नसल्याने अशी वाहने महानगरपालिकेच्या गोदामात पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहर व उपनगरातील उड्डाणपुलाखाली, रस्त्याच्या बाजूला उभ्या असणाऱ्या वाहनांची लिलाव प्रकिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नादुरुस्त व बंद पडलेल्या वाहनांवर संबंधित वाहतूक पोलीस विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाकडून संयुक्त कारवाई करुन महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाच्या परिक्षेत्रात उपलब्ध असलेल्या जागेवर सदर वाहने ठेवण्यात आली आहेत.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ६३०६ वाहने जप्त करण्यात आली आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) जप्त केलेल्या वाहनांबाबत संबंधित वाहतूक पोलीस विभाग व पोलीस विभाग यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रचलित पध्दतीनुसार जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करुन विल्हेवाट लावण्यात येते.

यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून जप्त करण्यात आलेल्या एकूण ४५३३ गाड्यांचे लिलाव करुन महानगरपालिकेस रुपये ४,२३,५०,५९३/- इतका महसूल प्राप्त झालेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सारथीमार्फत शैक्षणिक सवलती आणि सुविधा देण्यासाठी सर्वकष धोरण ठरविण्याबाबत

**(४६) * १९४७३ श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सारथीमार्फत देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती आणि सुविधांबाबत सर्वकष समान धोरण ठरविण्यासाठी बार्टी, टीआरटीआय, महाज्योती आणि सारथी या संस्थांची बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी दिली असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह उपलब्ध व्हावे यासाठी वसतिगृहाच्या कामाला जिल्हास्तरावर अधिक गती द्यावी, ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध होत नाही त्यांच्याकरिता स्वाधार योजनेच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना दरमाह ६ हजार रुपये दहा महिन्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास मराठा समाजाच्या आरक्षण आणि सुविधांसाठी गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उप समितीची बैठक नुकतीच संपन्न झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी मराठा समाजाला आरक्षण आणि मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती व सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना / कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य तथा अध्यक्ष, मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमिती यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०/०५/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सारथीमार्फत देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती आणि सुविधांबाबत सर्वकष धोरण ठरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, स्वाधार योजनेच्या धर्तीवर ईडब्ल्युएस विद्यार्थ्यांना ही योजना लागू करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ९/१०/२०२० अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील (मराठा समाज) घटकांना विविध सवलती देण्यात आल्या आहेत. तसेच, मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी सारथी संस्था व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ यांचेमार्फत विविध योजना राबविल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शालांत पूर्व शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत वाढ करणेबाबत

**(४७)** * **२०४९७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित मान्यताप्राप्त दिव्यांग शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत "शालांत पूर्व शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती" योजनेंतर्गत केवळ शंभर ते दोनशे रुपये शिष्यवृत्ती दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याची मागणी दिव्यांग विद्यार्थ्यांनी वेळोवेळी केलेली असूनही गत १९ वर्षांपासून शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत किमान चारशे रुपयांची वाढ करून विहित वेळेत शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यांवर जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर शिष्यवृत्ती दिव्यांगांच्या अनुदानित अनिवासी विशेष शाळा मधील विद्यार्थ्यांना दिली जाते.

(२) हे खरे नाही.

सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक ३०/०८/२०१४ च्या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यात आलेली आहे.

(३) शिष्यवृत्ती दरामध्ये वाढ करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४८) * १९५६८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २३ महानगरपालिका असून मुंबई, पुणे, औरंगाबाद यांसारख्या अनेक शहरांमध्ये महानगरपालिका शाळांची संख्या मोठी असून या ठिकाणी रिक्त शिक्षकांची संख्या अधिक असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने किमान पाचशे शिक्षकाची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक ही पदे सरळसेवेने भरण्याबाबत शासनाचा नियम असतानाही ही पदे अद्याप रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शिक्षकांची व इतर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या पवित्र पोर्टलमार्फत रिक्त पदांवर भरती करण्याची कार्यवाही बृन्हमुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व औरंगाबाद महानगरपालिका तसेच इतर महानगर पालिकांकडून कार्यान्वित आहे.

बृन्हमुंबई महानगरपालिकेत शासनाकडील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करुन महानगरपालिका शाळांना तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक उपलब्ध करण्यात आलेले आहेत. तसेच तासिका तत्वावर तात्पुरते शिक्षक उपलब्ध करण्यासाठी कायमस्वरुपी तरतुद करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पवित्र पोर्टलमार्फत रिक्त पदांवर भरती करण्याची कार्यवाही बृन्हमुंबई महानगरपालिकेकडून कार्यान्वित आहे.

(३) अंशत: खरे आहे.

केंद्र प्रमुखांच्या मंजूर पदांच्या ५०% पदे मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे व ५०% पदे पदोन्नतीने भरली जातात. मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे भरल्या जाणाऱ्या ५०% पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असल्याचे, तसेच मुख्याध्यापक या संवर्गातील रिक्त पदे अर्हताधारक शिक्षकांमधून सेवाज्येष्ठतेने भरली जात असल्याचे शालेय शिक्षण विभागाने कळविले आहे.

(४) शालेय शिक्षण विभाग व इतर महानगरपालिकांकडून रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामांबाबत

**(४९) * १९७०७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (जि.ठाणे) येथील बेकायदा व अनधिकृत बांधकामांबाबत महापालिकेकडे स्थानिकांनी अनेकदा तक्रारी करूनही सहायक आयुक्तांनी त्याबाबत दखल न घेतल्याप्रकरणी पालिका आयुक्तांनी त्यांना दिनांक ५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास कारणे दाखवा नोटीस बजाविली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी केली असता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका हद्दीतील कळवा प्रभाग कार्यक्षेत्रातील बेकायदा व अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरून संबंधित सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, कळवा प्रभाग समिती यांना दिनांक ०४/०५/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, उक्त नोटीशीस अनुसरून संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांचा खुलासा दिनांक ०९/०५/२०२३ रोजी सादर केला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेता, शासन निर्णय दिनांक ०२/०३/२००९ मधील मार्गदर्शक सूचनेच्या अनुषंगाने आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिनांक २६/१२/२०२२ च्या पत्रान्वये अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करण्यासाठी यापूर्वीच निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेस पुनश्च: निर्देश देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत कोरोना कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध बांधकामे करण्यात आल्याबाबत

**(५०) * १९१३२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये सन २०२० मध्ये लागलेल्या टाळेबंदीपासून ते टाळेबंदी शिथील केल्यानंतर भूमाफिया व झोपडीदादांकडून मोठ्या प्रमाणावर अवैध बांधकामे उभारण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईमध्ये माहे मार्च, २०२० ते फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत एकूण ९ हजार ५०० अवैध बांधकामाची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागात दिनांक ०१/०३/२०२० ते दिनांक २८/०२/२०२१ या कालावधीमध्ये ६६८१ अनधिकृत बांधकामाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ३४३२ बांधकामांना नोटीस देण्यात आल्या असून ९३७ अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली.

न्यायालयीन कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच उर्वरित अनधिकृत बांधकामांवर पोलीस बळाच्या उपलब्धतेनुसार निष्कासन कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिडको आस्थापनेवरील समन्वयक व सल्लागार पदावर नियुक्ती दर्शवून फसवणूक केल्याबाबत

**(५१) * १९००९ श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिडको आस्थापनेवरील कुठल्याही पदावर नियुक्ती नसताना १४ कर्मचाऱ्यांची समन्वयक व सल्लागार पदावर नियुक्ती दाखवून वेतनापोटी सुमारे ३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरम्यान या प्रकरणाच्या चौकशीअंती एकूण २८ बनावट कर्मचाऱ्यांनी सिडको महामंडळाचे वेतन घेतल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने सन २०१७ पासून हा प्रकार सुरू असल्याची गंभीर दखल घेत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश सिडकोचे व्यवस्थापकीय संचालकांनी दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बनावट कंत्राटी कामगार दाखविणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी तथा कर्मचाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) दक्षता तपास अधिकारी यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीअंती सन २०१७ पासून २८ व्यक्तींच्या बनावट स्वाक्षऱ्या व कागदपत्रांच्या आधारे दक्षता तपास अधिकारी, सिडको यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीअंती बनावट कर्मचाऱ्यांना वेतनापोटी रुपये २,८१,९३,४८४/-अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

यासंदर्भात श्री.सागर तपाडिया सहाय्यक विकास अधिकारी, कार्मिक विभाग, सिडको यांनी गुन्हा कबुल केल्यानुसार त्यांना दिनांक १३/०४/२०२३ रोजी निलंबित करण्यात आले आहे.तसेच श्री.सागर तपाडिया यांच्यावर बेलापूर पोलीस ठाणे येथे एफआयआर क्र. ७५/२०२३ अन्वये भा.द.वि. १८६० च्या

कलम ४२०, ४०९, ४६५, ४६८, ४७१ व ४७४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नियोजित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सभोवतालचा विकास करण्यासाठीच्या नैना प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(५२)** * **२०००१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल येथे सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सभोवतालचा विकास करण्यासाठी नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींनुसार २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी शासन अधिसूचनेन्वये मंजूर करण्यात आलेला नैना प्रकल्प रद्द करण्याची मागणी नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समितीने माहे मार्च, २०२३ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नैना प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या कोट्यवधी किंमतीच्या जमिनींसाठी स्थानिक शेतकऱ्यांना कोणतीही पुर्वसूचना न देता सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीरात देवून टेंडर नोटीस देण्यात आल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड, उप विभागीय अधिकारी, पनवेल, शहरी/ग्रामीण पोलीस स्टेशन, पनवेल येथे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांच्या कोट्यवधी रुपयाच्या मुल्य असलेल्या जमिनी संपादित करुन नैना व सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून बाजार मुल्य जास्त असलेल्या जमिनी विकासकांना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या जमिनींचे बाजारमुल्य कमी आहे ज्या बांधकाम करण्यायोग्य नाहीत अशा जमिनी स्थानिक जमीन मालकाला ४० टक्के मध्ये देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने नैना प्रकल्पामध्ये प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना ६० टक्के पेक्षा जास्त मोबदला देण्याबाबत तसेच जमिनीच्या बदल्यात देण्यात येणारी ४० टक्के जमीन ही मूळ प्रकल्पाच्या लगत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) अशा प्रकारची तक्रार करण्यात आलेली नाही. तथापि, उपविभागीय अधिकारी, पनवेल कार्यालयाकडे नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समितीने दिनांक १/२/२०२३ रोजी आंदोलना संदर्भातील निवेदन दिले आहे.

नैना क्षेत्रामधील पहिल्या टप्प्यातील २३ गावांचा विकास १२ नगर रचना परीयोजनांच्या (TPS) माध्यमातून करण्यात येत आहे. नगर रचना परियोजना घोषीत केल्यापासून ते अंतिम मंजूरीपर्यंत संपूर्ण प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी जाहीर सूचनेद्वारे, पत्राद्वारे, जमीन मालकांच्या सभेमार्फत, स्थानिक वृत्तपत्राद्वारे, ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सूचना देऊन, सिडकोच्या संकेत स्थळावर इत्यादी माध्यमांतून भूधारकांस तसेच स्थानिक शेतकऱ्यांना नैना प्रकल्पाबाबत माहिती पुरविण्यात येते. सदर १२ TPS पैकी नगर

परियोजना क्र.१ ते ३ च्या प्राथमिक योजनांना शासनाची मंजुरी प्राप्त झाली आहे. तर नगर रचना परियोजना क्र.४, ५, ६ व ७ ला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८(२) नुसार प्रारूप मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८अ व ८८ मधील तरतुदींनुसार नगर रचना परियोजना क्र.१ ते ७ मधील रस्त्यांखालील जमिनी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोकडे निहित झाल्या आहेत. त्यानुषंगाने दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये रस्त्यांच्या विकास कामांसाठी टेंडर नोटीस (निविदा सूचना) देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) नैना मधील नगर रचना परीयोजनेत सहभागी सर्व जमीन मालकांना मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचा अंतिम भूखंड अनुज्ञेय आहे. शक्यतोवर अंतिम भूखंड ज्या गावातील मूळ जमीन आहे त्याच गावात आरेखीत करण्यात येतात. जर मूळ जमिनीवर आरक्षण असेल तर अंतिम भूखंडाचे आरेखन मूळ जमीन किमती समान किंवा त्यापेक्षा जास्त किमत असलेल्या जमिनीवर दिला जातो. तसेच आरक्षणामुळे त्याच गावात अंतिम भूखंड देणेकरीता जागा उपलब्ध नसल्यास नजीकच्या गावात अंतिम भूखंड आरेखित करण्यात येतो. असा वेळेस अंतिम भूखंड मूळ जमिनीच्या दरापेक्षा कमी किमतीच्या जमिनीवर देण्यात आला असल्यास अशा भूखंडाच्या अंशदानाच्या (बेटरमेंट चार्जेस) रकमेमध्ये सदर दराची तफावतीची नोंद घेण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात हीट ॲक्शन प्लॅन योजना राबविण्याबाबत

**(५३) * १९०७८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने अधिक उष्णता असणाऱ्या वेगवेगळ्या शहरांकरीता हीट ॲक्शन प्लॅन तयार केला असून राज्यातील विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील अधिक उष्णता असणाऱ्या शहरांमध्ये सदर हीट ॲक्शन प्लॅन राबविणे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलते वातावरण, पर्यावरणाचा ऱ्हास यामुळे उष्णतेमध्ये अधिक वाढ झाल्यामुळे नागपू, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, अकोला, वाशिम व बुलढाणा या शहरांमध्ये इतर शहरांच्या तुलनेपेक्षा उन्हाळयाच्या दिवसात अधिक उष्णतेची लाट येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी किती उष्णता वाढते, पारा किती अंशावर गेल्यास मृत्यू ओढवितात अणि आरोग्यावर याचा काय परिणाम होत आहे, तसेच गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक यांना कोणता घटक अशा प्रकारच्या उष्णतेने अधिक प्रभावित करतो अशा प्रकारचे अध्ययन या हीट ॲक्शन प्लॅनच्या माध्यमातून केले जाणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात हीट ॲक्शन प्लॅन राबविण्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात येणार आहे तसेच हीट ॲक्शन प्लॅन राबविताना निरीसारख्या संस्थेला विश्वासात घेणे, शिवाय यासंदर्भात कोणती नोडल एजन्सी नेमण्यात येणार आहे, त्याचा कालावधी काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्याने तयार केलेल्या 'उष्मा लाट आराखडा २०२२-२३' मध्ये २०३०, २०५०, २०७० मध्ये होणारी संभाव्य तापमान वाढ नमूद करण्यात आली आहे. तसेच उष्माघाता मुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची विस्तृत माहिती समाविष्ट आहे. परंतु गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक यांना कोणता घटक अशा प्रकारच्या उष्णतेने अधिक प्रभावित करतो तसेच पारा किती अंशावर गेल्यास मृत्यू ओढवतो या बाबतची कोणतीही माहिती नाही, कारण उष्माघातामुळे होणारा मृत्यू हा विविध घटकांशी निगडीत आहे.

मागिल २५ वर्षांची आकडेवारी विचारात घेऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करुन शास्त्रोक्त पध्दतीने विश्लेषण करून तीव्र, मध्यम व कमी प्रभावांचे जिल्हे निश्चित करण्याचे काम करण्यात येणार आहे. तसेच सर्व जिल्ह्यांसाठी कृती आराखडा करण्याचे प्रयोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने अद्याप उष्णतेची लाट ही एक नैसर्गिक आपत्ती म्हणून अधिसूचित केलेली नाही, त्यामुळे राज्यात हीट ॲक्शन प्लॅन राबविण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद नाही. तथापि, राज्यातील आपत्तीला प्रतिसाद देण्याकरीता करावयाच्या उपायोजनांसाठी सर्व जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात येतो.

राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी जिल्हानिहाय कृती आराखडा करण्याचे प्रयोजन असून त्याकरीता आवश्यकतेनुसार संबंधित क्षेत्रातील तज्ञ संस्थांची मदत घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सम्रग शिक्षा अभियानांतर्गत विविध पदावर कंत्राटी पध्दतीने कार्यरत शिक्षकांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(५४)** * **१९३५२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी केंद्र व राज्य शासन पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान शैक्षणिक वर्ष २०००-२००१ मध्ये समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा समन्वयक, समावेशित शिक्षण (अंध, मतीमंद, व कर्णबधीर प्रवर्ग), विषय साधनव्यक्ती, विशेष शिक्षक इ. विविध पदांवर कंत्राटी पध्दतीने शेकडो शिक्षक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ६ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांना शाळेत दाखल करून इयत्ता १२ वी पर्यंतचे दर्जेदार शिक्षण देणे, सामाजिक आणि लैंगिक दरी नष्ट करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमित शाळेत समावेशित शिक्षण देणे, गळतीचे प्रमाण शून्य टक्क्यांपर्यंत आणणे, मुला-मुलींना शिक्षण देणे इत्यादी कामे शिक्षक पार पाडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपक्रमांतर्गत कार्यरत असणाऱ्या एम.आय.एस. कोऑर्डीनेटर, संगणक प्रोग्रामर व डाटा एन्ट्री ऑपरेटर इत्यादी संगणकीय बाबींचे अद्ययावत ज्ञान असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागातील संगणकीय माहिती संकलित करणे, सांख्यिकीय संशोधन करणे, वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक निर्मिती करणे, जिल्हा व तालुका स्तरावरील संपूर्ण शाळानिहाय माहिती तयार करणे आणि अध्यापन विषयक कर्तव्य पार पाडणे अशा जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या शिक्षकांना रिक्त व विशेष शिक्षक पदावर कायम स्वरुपात सामावून घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षकांना रिक्त व विशेष शिक्षक पदावर कायम स्वरुपात सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये समग्र शिक्षा अभियानांतर्गत सद्य:स्थितीत जिल्हा समन्वयक, समावेशित शिक्षण (अंध, मतीमंद व कर्णबधीर प्रवर्ग) ३ पदे, विषय साधनव्यक्ती ५५ पदे, विशेष शिक्षक, समावेशित शिक्षण (अंध, मतिमंद व कर्णबधीर प्रवर्ग) ३३ पदे व इतर संवर्गातील २५ पदे अशी एकूण ११६ पदे कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहेत.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ६ ते ८ वयोगटातील मुलांना शाळेत दाखल करुन इयत्ता १२ पर्यंतचे दर्जेदार शिक्षण देणे, सामाजिक आणि लैंगिक दरी नष्ट करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमित शाळेत समावेशित शिक्षण देणे, गळतीचे प्रमाण शून्य टक्क्यांपर्यंत आणणे, मुला-मुलींना शिक्षण देणे इत्यादी कामे वर्गशिक्षकांनी पार पाडण्यासाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचारी साधनव्यक्ती म्हणून काम पाहतात.
(३) व (४) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कर्मचाऱ्यांची कंत्राटी तत्वावर निवड करण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्यांना दर सहा महिन्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून सेवा सातत्य दिले जाते.

समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच मानधन आदीबाबत पूर्णत: जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांची आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सेवादायित्व हे पूर्णत: केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

यास्तव, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम करता येणे शक्य नसल्याचा निर्णय महानगरपालिका शिक्षण समितीच्या ठराव क्रमांक १२१, दिनांक २१/०१/२०२० अन्वये घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषदेंतर्गत मॅरेथॉन नगरी येथील रस्ता विकास आराखड्यानुसार तयार करण्याबाबत

**(५५) * १९९९५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषदेअंतर्गत येत असलेल्या शिरगाव येथील मॅरेथॉन नगरी समोरील रस्ता दिनांक २५ जुलै, २००५ रोजी मंजूर करुनही सदर रस्ता विकास आराखड्यानुसार तयार करण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले असून सदर रस्त्याचे काम विकास आराखड्यानुसार विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी स्थानिक रहिवासी अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिरगाव येथील मॅरेथॉन नगरी समोरील रस्ता विकास आराखड्यानुसार तयार करुन लोकोपयोगासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील मौजे शिरसगांव बदलापूर (पूर्व) येथील मॅरेथान नगरी समोरील रस्ता विकास योजनेप्रमाणे अंशत: अस्तित्वात असून उर्वरित रस्ता वहिवाटीप्रमाणे करण्यात आलेला आहे.
(२) ताब्यात असलेल्या विकास योजना रस्ता व वहिवाटीच्या रस्त्यावर कोणतेही पक्के अनधिकृत बांधकाम नसून प्रस्तावित विकास योजना रस्ता व पार्किंग आरक्षण असलेल्या खाजगी जमीनीवर पत्र्याचे शेड आहे. अस्तित्वातील वापरात असलेला वहिवाटीचा रस्ता पूर्ण करण्याबाबत स्थानिक रहिवाश्यांची मागणी आहे.
(३) सदर रस्ता विकास योजनेप्रमाणे अंशत: तयार करण्यात आलेला असून रस्त्याने बाधित काही जमीन खाजगी मालकीची व पार्किंग या आरक्षणालगत आहे. सदर जागा ताब्यात आल्यानंतर संपूर्ण रस्ता विकास योजनेप्रमाणे संलग्न करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उष्माघाताने होणाऱ्या मृत्युंना नैसर्गिक आपत्ती म्हणून गृहीत धरून मृतांचे कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५६) * २०११४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उष्णतेच्या प्रमाणात वाढ झालेली असताना महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात ११ नागरिकांचा उष्माघाताने मृत्यू झाला असून तसेच जळगाव जिल्ह्यात सुद्धा उष्माघातामुळे बऱ्याच नागरिकांचा मृत्यू झालेला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उष्माघाताने होणाऱ्या मृत्युंना नैसर्गिक आपत्ती म्हणून गृहीत धरून मृतांचे कुटूंबियांना शासनाकडून किमान ५ लाख रुपये आर्थिक मदत मिळणेबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दिनांक १४ मे,२०२३ रोजी पत्रव्यवहार करून मागणी केलेली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उष्माघाताने होणाऱ्या मृत्युंना नैसर्गिक आपत्ती म्हणून गृहीत धरून मृतांचे कुटूंबियांना शासनाकडून किमान ५ लाख रुपये आर्थिक मदत देणेबाबत शासनाकडून काय कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय हे खरे आहे.

खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळयात १४ नागरिकांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. त्याचप्रमाणे जळगाव येथे २ उष्माघात संशयीत रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(२) दिनांक १४ मे,२०२३ चे निवेदन विभागास प्राप्त झाले नाही.

(३) राज्यात उष्माघात ही नैसर्गिक आपत्ती म्हणून अधिसुचीत केली नसून ती अधिसुचीत करण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधिन आहे.तथापि, खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळयात उष्माघाताने मृत्यू पावलेल्या १४ नागरीकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रुपये ५ लक्ष देण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहायक मोटार वाहन निरीक्षक पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

**(५७)** * **२०३७० प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परिक्षेद्वारे १२ माजी सैनिकांची सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदावर दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकान्वये एक महिन्याच्या आत या पदावरील निवड झालेल्या व्यक्तींना नियुक्ती देणे बंधनकारक असताना संबंधितांना मागील ८ महिन्यांपासून प्रतिक्षेत ठेवण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदावर निवड झालेल्या संबंधितांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षणाची समकक्षता सादर करणे आवश्यक असल्यास त्यांना निवड झालेल्या पदावर नियुक्ती देऊन त्यांच्या परिविक्षाधीन कालावधीत त्यांना समकक्षता प्रमाणपत्र सादर करुन घेता येईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदावर निवड झालेल्या १२ माजी सैनिकांना शासन सेवेत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे : (**१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ३१/१०/२०२२ च्या पत्रान्वये विविध प्रवर्गातील माजी सैनिकांसाठी आरक्षित पदांकरीता एकूण २९ उमेदवारांची सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदावर नियुक्तीसाठी शिफारस केली आहे.

(२), (३), (४) व (५) सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा-२०२० मधून शिफारसपात्र उमेदवार विहित अर्हता धारण करीत असल्याचे नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासूनच त्यांची नियुक्ती करण्यात यावी अशा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे शिफारस करण्यात आलेल्या २९ माजी सैनिक उमेदवारांपैकी १४ उमेदवारांना सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच, उर्वरित उमेदवारांची अर्हता तपासण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या ‘गट ब’ व ‘गट क’ सेवा संयुक्त पूर्व परिक्षेचा निकाल स्वतंत्ररित्या जाहीर करण्यात येणार असल्याबाबत

**(५८) * १९६३० श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यांत आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित ‘गट ब’ व ‘गट क’ सेवा संयुक्त पूर्व परिक्षेअंतर्गत विविध पदांवरील ८१६९ जागांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी महाराष्ट्र अराजपत्रित ‘गट ब’ मधील सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि दुय्यम निबंधक या ११३५ जागांकरीता परीक्षा घेण्यांत आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याआधी ‘गट ब’ मधील चारही पदांचा अभ्यासक्रम वेगळा असल्याने त्याची परिक्षाही स्वतंत्र होत होती, आता समान अभ्यासक्रम आणि एकच परीक्षा असतानाही स्वतंत्र निकाल जाहीर होणार असल्याने गुणांची सिमारेषा (कट ऑफ) वाढणार असल्याने अनेक परिक्षार्थींवर अन्याय होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयामुळे मुख्य परिक्षेसाठी कमी उमेदवारांची निवड होणार असल्याने आयोगाने एकच गुणवत्ता यादी जाहीर करणेबाबत तथा असलेल्या जाचक अटींमध्ये बदल करणेबाबतची मागणी अनेक संघटनांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन परिक्षार्थ्यांना न्याय देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मुख्य परीक्षेसाठी प्रत्येक संवर्गाच्या विज्ञापित पदसंख्येच्या १२ पट उमेदवार उपलब्ध होतील अशा प्रकारे गुणांची किमान सिमारेषा (cut off) निश्चित करण्यात येते व त्यावरुन गुणवत्तेनुसार उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येतो. विज्ञापित पदसंख्या विचारात घेऊन गुणवत्तेनुसार उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येत असल्यामुळे एकच संयुक्त पूर्व परीक्षा आयोजित करुन प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्र निकाल जाहीर केल्यास मुख्य परीक्षेसाठी कमी उमेदवारांची निवड होणार असल्याच्या मुद्यांत तथ्य नाही. लोकसेवा आयोगाकडून राबविण्यात येणारी निवडप्रक्रिया ही केवळ गुणवत्तेवर आधारित असल्यामुळे कोणत्याही उमेदवारावर अन्याय होण्याची शक्यता नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे गत तीन वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्याबाबत

**(५९) * १९६८३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात तीन वर्षांत झालेल्या अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, चक्रीवादळ अशा नैसर्गिक आपत्तींमध्ये येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे सुमारे ३३ टक्के नुकसान झाले असून, माहे मार्च, २०२३ नंतर झालेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये आणखी ९० बागायतदारांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण तालुक्यातील सुमारे ५५७ शेतकऱ्यांचे अंदाजे नुकसान २४ लाख ७८ हजार एवढा आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नुकसानीच्या पंचनाम्याची माहिती तहसिलदार, उरण यांच्याकडे प्राप्त झालेली असूनही अद्याप नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उरण तालुक्यातील गत तीन वर्षांपूर्वीच्या नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) जुलै २०१९ ते डिसेंबर २०२१ या कालावधीतील विविध नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या एकूण ३६०२ शेतकऱ्यांना १२०२.५० हेक्टर आर नुकसानीच्या क्षेत्राकरीता रुपये १५८.८२ लक्ष निविष्ठा अनुदान देण्यात आलेले आहे तसेच मार्च २०२३ मध्ये अवेळी पावसामुळे उरण तालुक्यात झालेल्या शेतीपिकांच्या ३२.९५ हेक्टर आर क्षेत्रावरील नुकसानीकरीता रुपये ७.६९ लक्ष इतका निधी मंजूर केलेला असून हा मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची कार्यवाही संगणकीय प्रणालीवर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील मंजूर झालेल्या विकास कामांबाबत

**(६०) * १८८२० श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२३९ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील मंजूर झालेल्या विकास कामांसाठी शासनाने दिनांक ६ मे, २०२२ रोजी रुपये १ कोटी रुपये मंजूर केले असून सातारा जिल्ह्यातील कोरेगांव नगर पंचायतीअंतर्गत सदर कामे करताना मेगा हायवे काँक्रीटीकरणाची जाडी समाविष्ट करुन त्याची मान्यता

घेण्यात आली परंतु, प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे काँक्रिटीकरण केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे मर्जीतील ठेकेदारांना देण्यात आली असून नगरपंचायतीतील इंजिनिअर यांनी या कामांना भेटी न दिल्यामुळे सदरची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) शासनाने सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात दिनांक ६ मे, २०२२ रोजी विकास कामांसाठी रुपये १ कोटी मंजूर केल्याचे दिसून येत नाही.

• तसेच नगरपंचायतीमार्फत करण्यात येणाऱ्या कामांच्या अंदाजपत्रकामध्ये मेगाहायवे, काँक्रीटीकरणाची जाडी, असे नमूद करण्यात आलेले नाही.

• तथापि, शासनाने कोरेगांव नगरपंचायतीस सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात नवीन नगरपंचायत सहाय्यक योजनेंतर्गत विविध आदेशाद्वारे रुपये २५ कोटी, वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत रुपये ८१ लक्ष, विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत रुपये ३.३८ कोटी व विशेष रस्ता अनुदान रुपये ४.१९ कोटी इतका निधी मंजूर केला आहे.

(२) हे खरे नाही.

• कोरेगांव नगरपंचायतीमार्फत मंजूर कामे ई-निविदा प्रक्रिया राबवून करण्यात येत आहेत.

• कोरेगाव नगरपंचायतीचा अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार रहिमतपूर येथील अभियंत्याकडे सोपविण्यात आला असून त्यांचेकडून विकास कामांची स्थळ पाहणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील उद्योगांतून निर्माण होणारा कचरा महानगरपालिकेकडून उचलला जात नसल्याबाबत

**(६१)** * **१८९८६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहर हे औद्योगिक शहर असून येथील उद्योगांमधून निर्माण होणारा कचरा उचलला जात नसल्याने उद्योजकांना वर्षाकाठी रुपये १५ कोटींचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे नुकतेच माहे एप्रिल,२०२३ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने शहरातील भाग हा सन १९८४ साली महानगरपालिकेकडे हस्तांतरित केला असल्यामुळे विकास आराखड्यासह मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एमआयडीसीतील अघातक कचरा महानगरपालिकेकडून न उचलण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, एमआयडीसीतील अघातक कचरा उचलणे प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील उद्योगातून निर्माण होणारा औद्योगिक अघातक कचरा (Domestic Non Hazardous) महानगरपालिकेमार्फत संकलित केला जातो.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत औद्योगिक परिसरातील अंतर्गत रस्त्यांची साफसफाई केली जाते. परिसरातील कचरा ढीग संकलन वाहनामार्फत गोळा करून वाहतूक केली जाते.

तसेच औद्योगिक आस्थापनांचा निर्माण होणारा औद्योगिक अघातक कचरा (Domestic Non Hazardous) महानगरपालिकेमार्फत उचलला जातो.

दैनंदिन सरासरी ४५ टन कचरा औद्योगिक परिसरातून महानगरपालिकेमार्फत संकलित करण्यात येत असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६२)** * **२०४५६ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील इंदू मिल परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम मागील ६ महिन्यांपासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम संनियंत्रण व जलदगतीने व्हावे यासाठी मा.समाजकल्याण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या मंत्रिमंडळाची उपसमिती बरखास्त करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर स्मारकाचे काम माहे मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित असतानाही स्मारकास्थळी बसविण्यात येणाऱ्या पुतळ्याची प्रतिकृती अंतिम करणे, लागणारा निधी, अंतिम आराखडा व तत्संदर्भातील अन्य सर्वच प्रक्रिया मागील ६ महिन्यांपासून प्रलंबित असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर स्मारकाच्या संदर्भातील आवश्यक सर्व कामे विहित वेळे पूर्ण न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणे तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) मा.मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करण्यात आलेली नाही.

(३) व (४) स्मारकाच्या सुधारीत संरचनेनुसार बांधकाम नकाशे तसेच आवश्यक असणाऱ्या विविध मंजुऱ्या प्राप्त करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत स्मारक इमारतीचे काम १७ टक्के, स्मारक इमारत व पुतळा वगळता प्रकल्पाचे झालेले अंदाजित काम ५१ टक्के इतके पूर्ण झाले असून प्रकल्पाचे एकूण अंदाजित काम ३० टक्के काम पूर्ण झालेले आहे व उर्वरीत कामे प्रगतीत आहेत.

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्यांना लागलेला कालावधी, प्रकल्पातील स्मारकाची उंची ३५० फुटांवरून ४५० फुट (पादपीठ १०० फुट व पुतळा ३५० फुट) होणे तसेच कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या संकटामुळे निर्माण झालेली परिस्थिती यामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याच्या निर्धारित कालावधीत वाढ होऊन सदर कालावधी एप्रिल, २०२५ झाला आहे व त्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मंजूरी दिली आहे. सदर काम पूर्ण करण्यास निधीची कोणतीही अडचण नसून स्मारकाचे काम पूर्ण करण्याकरीता कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे. सदर काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजिले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांना स्वावलंबी बनविण्यासाठीच्या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६३) * १८८८५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फिरत्या वाहनांवरील दुकाने दिव्यांगाना देण्याबाबत शासनाने सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात घोषणा केली असून, त्यास पाच वर्षांचा कालावधी होऊनही सदरहू घोषणेची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मंत्रिमंडळाने दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी मान्यता दिल्याने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक १० जून, २०१९ रोजी शासन आदेश काढला असूनही याबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाने नव्याने सुरु केलेल्या दिव्यांग कल्याण विभागाला अद्याप पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे दिव्यांगांसाठीच्या फिरत्या वाहनांवरील दुकाने देण्याच्या योजनेला अंतिम स्वरूप आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिव्यांगांना स्वावलंबी बनविण्यासाठी आखण्यात आलेल्या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग व वित्त विकास महामंडळ, मुंबई यांना सन २०२१-२२ पासून आत्तापर्यंत रुपये १४.७५ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सन २०२३-२४ साठी रुपये १५.०० कोटी तरतुद करण्यात आली आहे.

(३) दिनांक १५/१२/२०२२ पासून दिव्यांग कल्याण विभाग नव्याने निर्माण करण्यात आला आहे. मा.मंत्रिमंडळाने क्षेत्रिय स्तरावर १९९६ पदे व मंत्रालयीन विभाग (खुद्द) साठी ६७ पदे अशी एकूण २०६३ पदे निर्माण करण्यास मंजूरी दिली आहे.

सध्यस्थितीत मंत्रालयीन विभाग (खुद्द) साठी ३२ व बाहययंत्रणेद्वारे १० पदे अशी एकूण ४२ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यापैकी २५ पदे भरण्यात आली असून उर्वरित पदे भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच उर्वरित क्षेत्रिय स्तरावरील पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव विभागामार्फत शासनस्तरावर सादर केला आहे.
(४) योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिनांक १०/०६/२०१९ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील कार्यक्रमात महापुरुषांचे पुतळे हटविल्याबाबत

**(६४) * २००२५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री व मा.खासदारांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे ठिकाणी पुर्वीपासूनच प्रतिष्ठापना केलेले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळे मूळ जागेवरुन हटवून तेथील शिवमुद्रा देखील आयोजकांनी झाकून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत राज्यातील जनतेकडून तसेच राजकीय पक्ष कार्यकर्ते यांनी संताप व्यक्त करुन आयोजकांविरुध्द कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली असल्याचे दिनांक ३० मे, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र सदनात आयोजित शासकीय कार्यक्रम समारंभाचे वेळी आवश्यकतेनुसार पुतळयांची जागा बदलण्यात येते असा खुलासा तेथील प्रभारी निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन यांनी केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी करण्याचे आदेश दिले असले तरी महापुरुषांचे पुतळे त्यांचे मूळ जागेवरुन हटविणे बाबत पूर्वीच्या घटनासह शासनाचे तसे काही आदेश वा निर्णयांसह चौकशी करुन चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा प्रकारच्या बातम्या प्रसारमाध्यमात प्रसारीत करण्यात आल्या होत्या. मात्र, त्या वस्तुस्थितीस अनुसरुन नाहीत. कारण क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळे कार्यक्रमादरम्यान होणाऱ्या संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने पुतळयांची सुरक्षा तसेच अनादर होऊ नये ही बाब लक्षात घेऊन पुनर्रचना करण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या वेळेस तसेच विविध कार्यक्रमांदरम्यान कुठल्याही महापुरुषांच्या पुतळयांचा तसेच देवीदेवतांच्या मूर्तीचा अनादर होऊ नये ही दक्षता घेण्यात आली होती.
(२) माधव सेना, नाशिक, वंचित बहुजन आघाडी, यवतमाळ व अहिल्यादेवी उत्सव समिती, अमरावती या संघटनांकडून अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाले ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदर घटनेसंबंधी निवासी आयुक्त (प्रभारी), महाराष्ट्र सदन यांनी दिनांक ०६.०६.२०२३ च्या पत्रान्वये यासंबंधीचा चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. त्यानुसार, सदनातील कार्यक्रमांसाठी पुतळयांची जागा बदलून ते सन्मानजनक ठिकाणी ठेवण्याची दक्षता एरवीही घेतली जाते.
(४) दिनांक ०६.०६.२०२३ रोजी निवासी आयुक्त (प्रभारी), महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचेकडून अहवाल विभागास प्राप्त झालेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत अभिलेख्यांमध्ये फेरफार करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(६५)** * **१८९६८ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत सर्व्हे नंबर १२९ मधील प्रसाद कॉलनीतील प्रसाद कृषी गृहनिर्माण संस्थेने ३ एकर ६ गुंठे क्षेत्राचे ले आऊट दिनांक २ फेब्रुवारी, १९८० रोजी मंजूर केले असून सदर रेखांकनाला दिनांक १३ फेब्रुवारी, १९८१ रोजी संबंधित कार्यालयाकडून अंतिम मंजुरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्व्हे नंबरमध्ये श्री.गुणवंत शंकर वाघमोडे यांनी नगरपरिषदेच्या विद्यमान मुख्याधिकाऱ्यांशी आर्थिक संगनमत करुन सदर रेखांकनामध्ये नगरपालिकेची खुली जागा दर्शविलेला भाग स्वतःच्या नावे अवैधरित्या करुन घेतला असून अवैध बांधकाम परवाना मिळवून शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरण उघडकीस आल्याने विद्यमान मुख्याधिकाऱ्यांनी गुंठेवारी आदेश रद्द करुन बांधकाम कार्यारंभ आदेश रद्द करण्यासाठी सुनावणी ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत दिवसेंदिवस अनियमिततेची गंभीर प्रकरणे मोठ्या प्रमाणावर उघड होत असल्याने सदर प्रकरणी विद्यमान मुख्याधिकारी, नगरपरिषद प्रशासन व जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे,

उस्मानाबाद नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. १२९ मधील सिटी सर्व्हे क्र.८६०० वर नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. परंतु, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ अन्वये नगरपरिषदेच्या दिनांक १०/०४/२०२३ रोजीच्या गुंठेवारी आदेशातील अट क्र.१ चा भंग केल्याने सदर आदेश रद्द करण्यात आला. सदर आदेश रद्द केल्यामुळे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ अन्वये कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली.
(३) हे खरे आहे.

उस्मानाबाद नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ अन्वये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने दिनांक २९ मे, २०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

तथापि, सदर कार्यवाहीविरुध्द संबंधितांनी मा.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबत मा.न्यायालयाने स्थगिती दिली आहे. सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(४) सदर प्रकरणी मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांच्या खुलाशानुसार, रचना सहायक, उस्मानाबाद नगरपरिषद यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोपोली नगरपालिका हद्दीत गत तीन वर्षांपासून मूलभूत सेवा सुविधांचा विकास प्रलंबित असल्याबाबत

**(६६) * १९४९७ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) नगरपालिका हद्दीत मागील दोन-तीन वर्षांत वाहतूक कोंडी, गटाराची दुरवस्था, प्रलंबित भुयारी गटार योजना, नागरी स्वच्छता व पाणी समस्या, भाजीपाला संकुलाचे प्रलंबित काम, शहरातील उद्यानांकडे दुर्लक्ष, छत्रपती शाहू महाराज सभागृह व नाट्यगृहाची दुरवस्था तसेच अनेक रस्त्यांचे डांबरीकरण व दोन प्रमुख रस्त्यांचे काँक्रिटीकरण मंजूर असतानाही प्रलंबित असून मूलभूत सेवा सुविधांचा विकास प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाजीपाला मार्केट संकुल, नियोजित व्यापारी संकुल, वाहनतळ, सिटी बस स्थानक सुशोभिकरण, अद्यावत क्रीडांगण, छत्रपती शाहू महाराज नाट्यगृहाची दुरुस्ती, सांडपाणी प्रक्रिया केंद्र आदी महत्वाची विकास कामे पूर्ण झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वच्छ सर्वेक्षण अभियानाशिवाय कोणतेही काम शहरात सुरू नसणे, उघड्यावर तुटलेली गटारे असून दुसरीकडे अतिरिक्त कचरा संकलन कर, अतिरिक्त पाणीपुरवठा कर यामुळे नागरिकांना भुर्दंड बसविण्याचे काम नगरपालिका प्रशासनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने शहरातील मूलभूत सोयीसुविधांचा विकास करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वाहतूक कोंडीचा मुद्दा सोडून इतर मुद्दयांच्या बाबतीत हे खरे नाही.

(२) भाजीपाला मार्केटचा मुद्दा सोडून इतर मुद्दयांच्या बाबतीत हे खरे नाही.

(३) व (४) खोपोली शहरात स्वच्छ सर्वेक्षणासोबतच उद्याने विकसित करणे, पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे, घनकचरा व्यवस्थापन, भुयारी गटार योजना, सामाजिक सभागृहे, रस्ते बांधणी व डांबरीकरण अशी अनेक विकास कामे सुरु आहेत. शहरातील गटारे सुस्थितीत असून वेळोवेळी

आवश्यकतेनुसार त्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. नगरपरिषदेने शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कचरा संकलन कर व पाणी लाभ कर आकारणी केलेला असून त्याव्यतिरीक्त कोणताही अतिरीक्त कर आकारण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील औषध खरेदीतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६७) * १९५३२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये तसेच रुग्णालयांत औषध खरेदी प्रक्रिया मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ऑनलाईन पध्दतीने राबवूनही जाणीवपुर्वक कृत्रिम औषधांचा तुटवडा निर्माण करुन मध्यवर्ती खरेदी कक्षातील अधिकाऱ्यांकडून महानगरपालिकेची दिशाभूल करत रुपये १०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा आरोप ऑल फुड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फाऊंडेशन या औषध वितरक संघटना व ‘समर्थन’ या संस्थेने लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग), मा.प्रधान सचिव (नगरविकास विभाग), मा.सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग), मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग) तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निविदा प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार किंवा अनियमितता झालेली नसून मध्यवर्ती खरेदी विभागाविरोधात करण्यात आलेल्या तक्रारी पूर्णपणे अंदाजावर आधारीत असल्याचे स्पष्टीकरण बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले असून औषध खरेदी करण्याचे आदेश प्रशासनामार्फत देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी वितरकांनी पुरवठा केलेल्या औषधांची रक्कम थेट संबंधित उत्पादक कंपनीच्या खात्यामध्ये जमा करण्याचा निर्णय घेतल्यामुळे महानगरपालिकेला औषध पुरवठा करणाऱ्या ४०० पेक्षा अधिक वितरकांना यांचा आर्थिक तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वस्तू आणि सेवा कराविषयक नियमांचे आणि निविदा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लघंन केल्यामुळे वितरक अडचणीत आले असल्यामुळे ऑल फुड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फाऊंडेशनने केलेल्या आरोपांची शासनाने सखोल चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका रूग्णालयांतील औषधांचा तुटवडा तातडीने दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये तसेच रुग्णालयात औषध खरेदी प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार ऑल फुड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फाऊंडेशन यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक २२/०४/२०२३ रोजीच्या ई-मेल द्वारे केली आहे.

तसेच समर्थन या संस्थेने मुख्यमंत्री कार्यालयाकडे दिनांक २५/०४/२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये तसेच रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याच्या बातमी वृत्तपत्रामध्ये येत असल्यामुळे महानगरपालिकेमार्फत दिनांक १५/०५/२०२३ रोजी दैनिक महाराष्ट्र टाईम्स व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये वार्तापत्र प्रसारित केले आहे. सदर वार्तापत्रामध्ये खालील मुद्दयांचा समावेश होता :-

- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याच्या निविदांमध्ये कोणतीही अनियमितता नाही.
- मध्यवर्ती खरेदी विभागाविरोधात करण्यात आलेल्या तक्रारी पूर्णपणे अंदाजावर आधारीत असून आरोपांमध्ये तथ्य नाही.
- रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याचे आदेश प्रशासनामार्फत देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

उत्पादकांनी वितरकामार्फत पुरवठा केलेल्या औषधांची रक्कम वितरक गोळा करु शकतात असा निर्णय अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नवी दिल्ली यांच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला आहे.

(४) उत्पादक निविदाकार निविदा प्रक्रियेत भाग घेताना वस्तु व सेवा करासह प्रचलित पध्दतीने लिफाफा "क" मध्ये दर सादर करतात. त्यामधुन पात्र लघुत्तम निविदाकारास खरेदीपत्र देण्यात येते. निविदाकाराने सादर केलेल्या वस्तु व सेवाकराच्या रक्कमेचे अधिदान महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. तसेच निविदा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन झाले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

औषधांच्या खरेदी वेळेस निविदा प्रक्रियेत फक्त उत्पादक भाग घेतात, वितरकांना सदर निविदा प्रक्रियेत भाग घेता येत नसल्यामुळे निविदा प्रक्रियेत वितरकांचा महानगरपालिकेशी थेट संबंध येत नाही.

(५) बृहन्मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध खरेदी करण्यासाठी महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ऑनलाईन पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून एकूण १२ औषध अनुसूचींची दरपत्रके निर्गमित करण्यात येतात.

सदर अनुसूची संपुष्टात येण्यापूर्वी मागविलेल्या औषधांचा साठा संपल्यामुळे काही विविक्षित औषधांची कमतरता जाणवली होती. रुग्णसेवा विस्कळीत होऊ नये म्हणून रुग्णालयीन स्तरावर सदर विविक्षित औषधे प्रचलित पध्दतीनुसार स्थानिक पातळीवर तसेच ई-दरपत्रिकेद्वारे खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात आली. नवीन अनुसूची दरपत्रक प्रसारित होईपर्यंत जुन्याच दराने पूर्वीच्या कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेऊन औषधांची खरेदी केली जाते.

तसेच, बाह्यरुग्ण विभाग व कक्षांमधील रुग्णांना काही विशिष्ट आजारांकरीता लागणारी महागडी औषधे ही रुग्णालयातील समाजसेवकांमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन दिली जातात. दारिद्र्य रेषेखालील गरिब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना अनुसुचित नसलेली तात्काळ लागणारी औषधे गरिब रुग्ण धर्मादाय निधीमधून उपलब्ध करुन दिली जातात.

तसेच, जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी आरोग्य योजना या योजनांमधून रुग्णांवर निशुल्क उपचार करण्यात येतात व औषधे उपलब्ध करुन दिली जातात.

संपुष्टात आलेल्या अनुसुचींबाबत नव्याने दरपत्रके तयार करण्यासाठी निविदा मागविण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गृहबांधणी योजनेंतर्गत विविध गृहनिर्माण संस्थांना शासनाचे ना-हरकत दाखला मिळण्याबाबत

**(६८) * १९९२६ श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समुह, मुंबई उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी उल्हासनगर, नागरी संकुलन, ठाणे, उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी पूणे, नागरी समुह, पूणे, उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नाशिक, नागरी समुह नाशिक व उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागपूर नागरी समुह, नागपूर या परिसरातील विविध गृहनिर्माण संस्थानी ना.ज.क.धा. (नागरी जमीन कमाल धारणा) अधिनियम १९७६ कलम २० अन्वये गृहबांधणी योजनेंतर्गत शासनाकडे ना-हरकत दाखल्याची मागणी केलेली असून काही गृहनिर्माण संस्था ह्या मोडकळीस आलेल्या असून पावसाळयात कोसळण्याची शक्यता निर्माण झालेली असल्याने सदर प्रकरण मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयात (नस्ती क्र.नाजक-२०२२/प्र.क्र.१६०/२०२२) माहे फेब्रुवारी,२०२३ पासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोडकळीस आलेल्या गृहनिर्माण संस्थाचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, उल्हासनगर नागरी समुहातील नाजकधा कलम २० च्या योजनेतील क्षेत्रावर स्थित गृहनिर्माण संस्थांना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेसाठी व अभिहस्तांतरण (Conveyance Deed) करण्यासाठी येत असलेल्या अडचणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर नागरी समुह, ठाणे यांनी दिनांक ६/१०/२०२२ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला अहवालाच्या अनुषंगाने क्र. नाजक २०२२/प्र.क्र.१६०/ नाजकधा या नस्तीमधून सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या इमारतींना अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत देण्याबाबत शासन पत्र दिनांक ११/०६/२०१९ नुसार सर्वसाधारण सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, अशा प्रकरणांमध्ये मानीव अभिहस्तांतरण प्रक्रियेत नाजकधा अंतर्गत ना-हरकत दाखला मिळण्याच्या अनुषंगाने होणारा विलंब व अडचणी विचारात घेता, नाजकधा कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत इमारतींना, सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून यापूर्वीच "भोगवटा प्रमाणपत्रासाठी" ना-हरकत देण्यात आली असेल तर, अशा संबंधित नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना अभिहस्तांतरणासाठी सक्षम प्राधिकारी, नाजकधा कार्यालयाची पुन्हा ना-हरकत घेण्याची आवश्यकता नसल्याबाबत शासन पत्र दिनांक २५/०३/२०२३ अन्वये कळविण्यात आले आहे.

आता, नाजकधा कलम २० अन्वये मंजूर योजनेंतर्गत इमारतींना सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून यापूर्वी "भोगवटा प्रमाणपत्रासाठी" ना-हरकत देण्यात आली नसेल तर, अशा संबंधित नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना शासन पत्र दिनांक १८/०७/२०२३ मधील अटी व शर्तीनुसार अभिहस्तांतरणासाठी ना-हरकत देण्याबाबत सर्व नागरी समुहांच्या जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र वन सेवा परीक्षा २०२१ च्या निकालातील पात्र उमेदवारांना Opt Out होण्याकरिता मुदत वाढवून देणेबाबत

**(६९) * १९५७७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वन सेवा परीक्षा, २०२१ मधील वन परिक्षेत्र अधिकारी (RFO) पदासाठीची तात्पुरती यादी (Provisional List) दिनांक १८ मे,२०२३ रोजी जाहीर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या उमेदवारांना वन परिक्षेत्र अधिकारी पदावर नियुक्त होण्याची इच्छा नसेल, त्यांना Opt Out होण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २५ मे २०२३ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य सेवा परीक्षा-२०२१ आणि कृषी सेवा परीक्षा २०२१ या परीक्षांचा निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नसून उमेदवारांनी महाराष्ट्र वन सेवा परीक्षा, राज्य सेवा परीक्षा आणि कृषी सेवा परीक्षा,२०२१ या तीनही परीक्षा एकाच वेळी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन सेवा परीक्षेचा निकाल राज्य सेवा आणि कृषी सेवा परीक्षांच्या आधी लागल्यामुळे वन सेवेत निवड झालेली उमेदवारांची इच्छा असूनही निकालातून Opt Out करू शकत नाहीत, वन सेवा परीक्षेतून Opt Out होण्याची मुदत दिनांक २५ मे,२०२३ रोजी समाप्त झाल्यास ज्या उमेदवारांची राज्य सेवा आणि कृषी सेवा परीक्षेत निवड होईल त्यांनी वन सेवा परीक्षेतील पद सोडून दिल्यास मोठ्या प्रमाणात वन परिक्षेत्र अधिकारी (RFO) हे पद रिक्त राहण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वन सेवा परीक्षेच्या निकालातून Opt Out होण्याची मुदत दिनांक २५ मे २०२३ रोजी समाप्त न करता राज्य सेवा परीक्षा आणि कृषी सेवा परीक्षा २०२१ यांचा निकाल लागेपर्यंत वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वन सेवा परीक्षेच्या निकालातून Opt Out होण्यासाठी दिनांक ३१/०५/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर वनसेवा परिक्षेचा अंतिम निकाल दिनांक १५ जून, २०२३ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच अंतिम निकालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०२१ व्दारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस दिनांक २२ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील १७० एकरांवर समुहविकास योजना (क्लस्टर) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असलेबाबत

**(७०) * १९७६९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (जि.ठाणे) येथील सुमारे १७० एकरांवर समुहविकास योजना (क्लस्टर) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून उक्त योजनेत १७० एकरचे १० भूखंड तयार करुन योजना राबविण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू योजना किती कालावधीत पूर्ण होईल याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा प्रकारचे निवेदन नगरविकास विभागाकडे दिनांक १९ मे, २०२३ किंवा त्यासुमारास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७१) * १९१२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील २५ लाख लोकसंख्येसाठी फक्त १६४ फायरमन उपलब्ध असून अग्निशमन विभागातील ६१८ पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, ठाणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून शहरात ठिकठिकाणी टोलेजंग इमारती/टॉवर्स उभारण्यात आले असून सदर इमारती/टॉवर्स करिता शिड्यांचीही कमतरता असून त्या उपलब्ध करुन देणेही आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे शहरात फायरमनची पदे रिक्त असल्याने अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने तात्काळ कार्यवाही करताना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी व फायरमनच्या संख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर फायरमन, वर्ग-३ या सवंर्गाची एकूण ४५० पदे शासन मंजूर असून त्यापैकी १७० पदे कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ६१९ पदे रिक्त असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) ठाणे महानगरपालिका अग्निशमन दलामध्ये टोलेजंग इमारती / टॉवर्सकरिता सद्य:स्थितीत ३ उंच शिड्या, ३२ मी. टी.टी.एल., ५४ मी. हायड्रोलीक प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत.

तसेच अग्निशमन विभागाचे सक्षमीकरण करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर वेळोवेळी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात येते.
(३) ठाणे महानगरपालिकेच्या अहवालानुसार अग्निशमन विभागाच्या उपलब्ध मनुष्यबळाचा उपयोग करुन सक्षमपणे तात्काळ प्रासंगिक प्रकरणी हाताळणी करण्यात येत आहे. तथापि, या विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) सदर प्रकरणी दिनांक २५/०४/२०२२ च्या शासन पत्रान्वये ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापना विभागातील विविध संवर्गातील अत्यावश्यक पदे भरण्याकरीता एक विशेष बाब म्हणुन यापूर्वीच मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तथापि, उक्त मंजुरीस अनुसरून महानगरपालिका स्तरावरुन पदभरती संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे शहराची वाढती लोकसंख्या व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन अग्निशमन विभागातील अत्यावश्यक पदांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यानुषंगाने आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एस' विभाग कार्यालयाच्या हद्दीत केलेल्या नालेसफाईच्या गैरकारभाराबाबत

**(७२) * १९०२८ श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील पावसाळा पूर्व कामांचा भाग म्हणून नालेसफाईची कामे हाती घेतली असून नाले सफाईची कामे पूर्ण झाल्याबाबत जाहीर केलेली आकडेवारी खोटी असून तसेच

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एस' विभाग कार्यालयाच्या हद्दीतील भांडूप आणि आसपासच्या परिसरातील मोठ्या नाल्याच्या सफाईसाठी दरवर्षीप्रमाणे सन २०२२ मध्ये कंत्राटदाराची नेमणूक करुन भांडूप आणि आसपासच्या परिसरातील नाल्यांमधून उपसलेला गाळ, मुंबई बाहेरील कचराभूमीत त्याची लावण्यात येणारी विल्हेवाट, कचरावाहू वाहनाचे आवश्यक ठिकाणी आणि नियोजित वेळेत वजन, नोंद आदीबाबत निविदेमध्ये अटी आणि शर्ती घालण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने आदेश देऊनही नालेसफाई दरम्यान नाल्यातून उपसलेल्या गाळाची कचराभूमीत विल्हेवाट लावण्याचे चित्रीकरण वेळीच संकेतस्थळावर उपलब्ध न करणे, एका नाल्यातून उपसलेला कचरा वाहून नेणाऱ्या वाहनाचे वजनकाट्यावर केलेल्या दंडात्मक कारवाईची नोंद देयकात नमूद न करणे आदी अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त अनियमिततेमुळे सन २०२२ च्या पावसाळयापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील तसेच 'एस' विभाग कार्यालयाच्या हद्दीत केलेली नालेसफाई संशयास्पद असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणूनही संबंधित दोषीविरोधात व संबंधित कंत्राटदाराविरोधात कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही, त्याची कारणे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील व 'एस' विभाग कार्यालयाच्या हद्दीतील नालेसफाईच्या अनियमिततेसंदर्भात कोणती कारवाई करण्यात येत आहे वा आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील नालेसफाईची कामे योग्यरितीने झाली असून, जाहीर झालेली आकडेवारी खरी आहे.

सन २०२२ मध्ये एस विभाग कार्यालयाच्या हद्दीतील मोठ्या नाल्याच्या सफाईसाठी काढण्यात आलेल्या निविदेमध्ये, नाल्यांमधून उपसलेला गाळ मुंबई बाहेरील खाजगी क्षेपणभूमीत नेऊन त्याची योग्य रितीने विल्हेवाट लावणे, कचरावाहू वाहनाचे आवश्यक ठिकाणी आणि नियोजित वेळेत वजन, नोंद इत्यादीबाबत अटी आणि शर्ती घालण्यात आल्या होत्या.

(२), (३) व (४) नाल्यातून उपसलेल्या गाळाची क्षेपणभूमीत विल्हेवाट लावण्याचे चित्रीकरण कंत्राटदाराने संकेस्थळावर उपलब्ध करण्याची अट प्रथमच सन २०२२ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये अंतर्भुत करण्यात आली आहे. यास्तव क्षेपणभूमीवर मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसणे, सर्व्हर डाऊन असणे, चित्रफितीचा आकार जास्त असल्यामुळे ते संकेतस्थळावर अपलोड होण्यास विलंब होणे इत्यादी तांत्रिक अडचणींमुळे केलेले चित्रीकरण संकेतस्थळावर वेळेत उपलब्ध होण्यास उशीर झाला. तथापि, क्षेपणभुमीवर काढण्यात आलेले चित्रफित हे जीओटॅग तसेच वेळ व दिनांक नमूद असलेले असून तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर चित्रफित संकेतस्थळावर उपलब्ध झाले आहे.

तसेच, गाळ वाहून नेणाऱ्या वाहनांवर महानगरपालिकेचे फलक नसणे, गाळ वाहनांमध्ये भरल्यानंतर वाहन आच्छादित न करणे, इत्यादी त्रुटींसाठी महानगरपालिकेने कंत्राटदारावर निविदेतील अटी व शर्तींनुसार रुपये ४,३२,०००/- इतका दंड आकारला आहे. त्यापैकी प्रथम देयकापर्यंतचा रुपये ३,१३,०००/- इतका दंड प्रथम देयकातून वसुल करण्यात आला असून उर्वरित रुपये १,१९,०००/- इतका दंड पुढील देयकातून वसुल करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमध्ये इंग्रजी वाचनवृध्दीकरिता कोट्यवधींचा खर्च करण्यात येत असल्याबाबत

**(७३)** * **२०३१३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमध्ये इंग्रजी वाचनवृध्दीसाठी इयत्ता आठवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना दैनिक इंग्रजी वर्तमानपत्र वाटपासाठी रुपये ३४,८९,६०० तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना आठवड्याच्या शेवटी इंग्रजी साप्ताहिक वाचनासाठी रुपये २२,४३,२५२ इतका वार्षिक खर्च करण्यात येत असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचनवृध्दीसाठी करण्यात येणाऱ्या खर्चाचा योग्य उपयोग होत नसून महानगरपालिकेच्या शाळेतील कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना वृत्तपत्र/विकेन्डर साप्ताहिकाचे वाटप न करता त्यांची रद्दी म्हणून विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत इंग्रजी या विषयासाठी स्वतंत्र शिक्षक किंवा इंग्रजी वृत्तपत्र/विकेन्डर साप्ताहिक वाचनालयामध्ये उपलब्ध करुन दिल्यास कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचवू शकत असतानाही अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत इंग्रजी या विषयासाठी स्वतंत्र शिक्षक किंवा इंग्रजी वृत्तपत्र/विकेन्डर साप्ताहिक वाचनालयामध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अधिकाराचा दुरुपयोग करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) द हिंदू वृत्तपत्र संस्थेमार्फत नवी मुंबई महानगरपालिका शाळेतील इयत्ता ८ व ९ वी तील विद्यार्थ्यांना ५ दिवसीय आठवडा वृत्तपत्र अंक वाटप करण्यात येते.

• १० वी तील विद्यार्थ्यांना साप्ताहिक वृत्तपत्र अंक वाटप करण्यात येते. सदर वृत्तपत्र अंकाचा विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयी ज्ञानात भर पडावी व शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी या उद्देशाने हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले आहे.

• सदर ५ दिवसीय आठवडा अंकारिता ऑगस्ट-२०२२ ते एप्रिल-२०२३ पर्यंत रुपये २५,८६,५८५/- इतका खर्च झाला आहे व साप्ताहिक अंकाकरीता जून-२०२२ ते मार्च-२०२३ पर्यंत रुपये २१,५२,३९५/- खर्च झालेला आहे.

• सदर संस्था नवी मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थ्यांप्रमाणे वृत्तपत्र अंक वाटप करून मुख्याध्यापकांमार्फत चलन प्रमाणित करते व त्यासोबत प्रति अंकाप्रमाणे देयक अदा केले जाते.

• शाळेतील कर्मचाऱ्यांकडून वाटप होणाऱ्या वृत्तपत्र अंकाचे रद्दी म्हणून विक्री झाल्याचे अद्यापपर्यंत निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४)  सदर उपक्रमामुळे महानगरपालिकेचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले हे खरे नाही.

तथापि, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासण्याच्या सूचना आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वशिष्ठी नदी पात्राच्या दोन्ही बाजूंनी संरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(७४) * १९४८५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील मुरादपूर, मिठागरी मोहल्ला, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर लोकवस्तीत पावसाळयात पुरामुळे वशिष्ठी नदी पात्राचे पाणी शिरल्यामुळे नागरिकांची आर्थिक व जीवितहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरामुळे होणारी जीवितहानी टाळण्यासाठी वशिष्ठी नदी पात्राच्या दोन्ही बाजूंनी संरक्षण भिंत बांधण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून चिपळूण नगरपरिषद, यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वशिष्ठी नदी पात्राच्या दोन्ही बाजूंनी संरक्षण भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) जुलै २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे चिपळूण शहरातील सुमारे ६०-७० टक्के भाग पुराच्या पाण्याने व्यापला होता.चिपळूण शहरातील मुरादपुर, मिठागरी मोहल्ला, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर या लोकवस्ती भागामध्ये महापुराचे पाणी शिरल्यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले होते. परंतु कोणतीही जिवीत हानी झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) चिपळूण शहरामध्ये पूर संरक्षण करणेसाठी गणितीय मॉडेल अभ्यास करणेबाबत केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र, पुणे यांचेमार्फत अभ्यास चालु असून त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाले नंतर उर्वरित पूर संरक्षक कामे प्रस्तावित करण्यात येतील असे उप अभियंता, पाटबंधारे उपविभाग, चिपळूण यांचे कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील भू-क्षेत्रावर नगररचना विभागाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करुन रहिवास प्रयोजनार्थ भूमी अभिन्यासास मंजूरी दिल्याबाबत

**(७५) * २०११५ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १७६६४ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील गट नं २४०/२/२, ६७५/२, ३७३/१, ६७९/१, ६७९/२, ६११, ३७१, २४५/१/२, २४२, ५१२/४ या भु-क्षेत्रावर नगररचना विभागाच्या अटी व शर्तीना डावलून रहिवास प्रयोजनार्थ भूमी अभिन्यासास मंजुरी दिलेली असल्याने याबाबत दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी बिल्किस बानो आसिफ बागवान यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे तक्रार दाखल केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ मे, २०२१ रोजी चौकशी करून कार्यवाही होणेबाबत पत्रव्यवहार केला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, जळगांव यांनी निर्देशित केल्यानुसार उपविभागीय अधिकारी, भुसावळ भाग व मुख्याधिकारी, नगरपंचायत मुक्ताईनगर यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, अहवालात काय शिफारशी करण्यात आल्या आहेत, तदनुसार शासनाने त्यावर काय कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय.

(४) (अ) मुख्याधिकारी, नगर पंचायत, मुक्ताईनगर यांनी दिनांक १४/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार, मुक्ताईनगर येथील गट नं. २४०/२/२, ६७५/२, ३७३/१, ६७९/२, ३७१ या जमिनींबाबत नगरपंचायत मार्फत अटी व शर्तींचे पालन करण्यात आलेले आहे.

गट नं. ६७९/२ पै. व ६११ बाबत अटी व शर्तीनुसार वृक्षारोपणाचे काम प्रगतीपथावर असल्याने ते पूर्ण झाल्यानंतरच अंतिम मंजुरीची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(ब) उपविभागीय अधिकारी, भुसावळ भाग, भुसावळ यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मुक्ताईनगर येथील गट नं २४०/२/२, ६७५/२, ३७३/१, ६७९/२, ६११, ३७१, २४२ या गटांमध्ये रस्ते, गटारी व वीज वाहिनी या नागरी सुविधा उपलब्ध आहेत.

ग.नं.६७९/२ पै. या गटास नगर पंचायत, मुक्ताईनगर कडून तात्पुरती मंजुरी देण्यात आलेली असून नागरी सुविधा अभावी अंतिम मंजूरी देण्यात आलेली नाही.

ग. नं. २४५/१/२ व ५१२/४ या गटांबाबत नागरी सुविधा केलेल्या नसल्याने संबंधित जमीनमालक यांना त्यांचे म्हणणे मांडणे कामी दिनांक १८/०७/२०२३ रोजी सुनावणी घेऊन सुनावणीअंती महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, जळगांव यांना अहवाल सादर केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास इंफ्लुएंजा प्रतिबंध लसीचा साठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७६)** * **१८९८८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे इंफ्लुंएजा (प्रतिबंधात्मक लस) प्रतिबंध लसीचा साठा अपुरा असून गेल्या काही दिवसांपासून इंफ्लुंएजा विषाणूचे उपप्रकार असलेल्या एच १, एच २ आदी विषाणुंचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे इंफ्लुंएन्झा या लसीचा साठा अपुरा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास इंफ्लुंएजा या प्रतिबंध लसींचा पुरवठा करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात H१N१ – १ रूग्ण, H३N२ विषाणूची बाधा झालेले १० रूग्ण आढळून आले. वरील आकडेवारीवरुन रूग्णांचे प्रमाण अत्यल्प असून विषाणूंचा प्रादुर्भाव वाढत नसल्याचे आढळ होत आहे.
(२) व (३) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून इंफ्लुंएन्जा लसीबाबत मार्गदर्शक सूचना व लस साठा प्राप्त होतो.

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य लसीकरण केंद्रास दिनांक ०९/०६/२०२२ रोजी हज यात्रेकरुंच्या लसीकरण मोहिमेकरीता इंफ्लुंएन्जा लसीचे ३१ डोसेस प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे ३१ यात्रीकरूंचे लसीकरण करण्यात आले. दिनांक ०१/०८/२०२२ रोजी इंफ्लुंएन्जा लसीचे ३५०० डोस प्राप्त झाले होते. ते महानगरपालिकेमार्फत ज्येष्ठ नागरीक व गरोदर महिला यांच्या लसीकरणाकरता वापरण्यात आलेले आहे.

तसेच दिनांक १०/०५/२०२३ रोजी हज यात्रेकरूंचे लसीकरण मोहिमेकरीता इंफ्लुंएन्जा लसीचे १६९ डोस प्राप्त झाले होते व त्याप्रमाणे १६९ यात्रेकरूंचे लसीकरण करण्यात आले.

तथापि, दिनांक ०१/०८/२०२२ नंतर इंफ्लुंएन्जा लसीचा साठा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेमार्फत राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागास इंफ्लुंएन्जा लसीचा पुरवठा करण्याबाबत पत्र देण्यात आलेले असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) नगरपंचायतीमध्ये कर वसुली कर्मचाऱ्याने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(७७)** * **२०६४५ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) नगरपंचायतीमध्ये माहे एप्रिल, २०२२ ते मार्च,२०२३ दरम्यान नागरिकांकडून कर रुपाने जमा केलेली रक्कम नगरपंचायतीच्या बँक खात्यात जमा न करता कर वसूली कर्मचाऱ्याने सदर रकमेचा अपहार केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास येऊनही वरीष्ठ अधिकारी व मुख्याधिकारी, खालापूर यांनी त्यावर वेळीच कार्यवाही न करता अर्थसंकल्प सादर करतेवेळी ताळेबंद हिशोबात दाखविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मधील तरतुदींनुसार अधिकारी व कर्मचारी यांच्या शिक्षेसंबंधी कलम ७९, प्रकरण ५ अन्वये कार्यवाही व्हावी, अशी निवेदने जिल्हा प्रशासनाकडे दिल्यानंतर त्यावर अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसणे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खालापूर नगरपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार डिसेंबर, २०२२ मध्ये उघडकीस आल्यानंतर मुख्याधिकारी, खालापूर नगरपंचायत यांचेमार्फत व्दिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशीअंती जबाबदार कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधिताविरुध्द पोलीस ठाणे, खालापूर येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहे एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत झालेला गैरव्यवहार हा बँक ताळमेळ विवरणाव्दारे (Bank Reconciliation) दिनांक ३१/३/२०२३ रोजी नगरपरिषद निधीच्या रोखवहीत दाखविण्यात आला असून सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे तयार करतवेळी सदर रक्कम दाखविण्यात येणार आहे.
(२) व (३) यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नगरपंचायतीस प्राप्त झाले असून याबाबतचा सविस्तर अहवाल नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.